मंगळवार, २६ डिसेंबर २०२३

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १३३

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक





● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 26 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-133 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05



## पाहिजेत

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

अकोला, बुलढाणा, वाशिम, हिंगोली येथे जिल्हा व तालुका प्रतिनिधी नेमणे आहेत.

इच्छुकांनी आपला अर्ज व बायोडेटा फोटोसह मेल किंवा व्हॉट्सअॅप करावा

**वसंत खडसे पाटील**

विभागीय प्रतिनिधी

**93735 78429**

aadhunikkesari@gmail.com


# मेहबुबा मुफ्ती नजरकैदेत

## अतिरेक्यांच्या हल्ल्यात पाच जवान शहीद

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : जम्मू आणि काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री आणि पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीच्या प्रमुख मेहबुबा मुफ्ती यांना नजरकैदेत ठेवण्यात आले आहे. पूंछ जिल्ह्यात तीन नागरिक मृतावस्थेत आढळल्यामुळे त्या सोमवारी सुरनकोटला जाणार होत्या. त्यांनी तेथे जाऊ नये याकरता त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले.**

२१ डिसेंबर रोजी जम्मू काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात दोन लष्करी वाहनांवर दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात चार जवान शहीद झाले होते. या हल्ल्यासंदर्भात चौकशीसाठी सुरक्षा दलांनी शुक्रवारी सकाळी आठ नागरिकांना ताब्यात घेतले. या आठ नागरिकांपैकी तिघांचा टोपा पीर परिसरात मृतदेह आढळून आला. अतिरेक्यांच्या हल्ल्यात पाच जवान शहीद झाले, तीन निष्पाप नागरिकांचा लष्कराने कोठडीत छळ केला, अनेक जण अजूनही हॉस्पिटलमध्ये आपल्या जीवाशी झुंज देत आहेत आणि आता एक निवृत्त एसपी मारला गेला. भारत सरकारने सांगितलेली सामान्य स्थिती कायम ठेवण्यासाठी निष्पाप लोकांचा जीव जात आहे. एकीकडे कर्तव्य बजावताना प्राणांची आहुती देणाऱ्या लष्कराच्या पाच जवानांची हत्या आणि दुसरीकडे शत्रूपासून आमचे रक्षण करणाऱ्यांनी अत्यंत रानटी रीतीने नागरिकांना मारले. जम्मू काश्मीरमधील प्रत्येक जीवन धोक्यात आहे आणि ग्राऊंट रिॲलिटीमुळे भारत सरकारच्या बनावट कथानकाला छेद मिळाला आहे, असे मेहबुबा मुफ्ती यांनी एक्सवर म्हटले होते. दरम्यान, याप्रकरणी घटनास्थळी मेहबुबा मुफ्की भेट देण्याकरता जाणार होत्या. परंतु, पोलिसांनी त्यांना अडवले आणि त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले आहे.



# सिमिलीपाल व्याघ्रप्रकल्पात सर्वाधिक 'मेलेनिस्टिक' वाघ

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** ओडिशातील सिमिलीपाल या व्याघ्रप्रकल्पात एक-दोन नाही तर तब्बल दहा 'मेलेनिस्टिक' वाघांची नोंद करण्यात आली आहे. भारतातील हा एकमेव व्याघ्रप्रकल्प आहे, ज्याठिकाणी देशातील सर्वच काळे म्हणजेच 'मेलेनिस्टिक' वाघ आहेत. केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने यावर शिक्कामोर्तब केले आहे. जगभरातील एकूण ७५ टक्के वाघ भारतात आहेत. २०२२ च्या व्याघ्रगणनेनुसार देशातील वाघांची संख्या तीन हजार ६८२ इतकी झाली आहे. यात ७८५ वाघांसह मध्यप्रदेश पहिल्या, ५६३ वाघांसह कर्नाटक दुसऱ्या, ५६० वाघांसह उत्तराखंड तिसऱ्या तर ४४४ वाघांसह महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आहे. वास्तविक ओडिशा या व्याघ्रसंख्येच्या जवळही नाही. मात्र, ओडिशातील सिमिलिपाल व्याघ्रप्रकल्प हा एकमेव आहे, ज्याठिकाणी एकूण १६ वाघांपैकी दहा वाघ काळे म्हणजेच 'मेलेनिस्टिक' आहेत. या व्याघ्रप्रकल्पाला त्याच्या अनुवंशिक रचनेमुळे एक वेगळे 'कन्झर्वेशन क्लस्टर' म्हणून ओळखले जाते.

गेल्या पाच वर्षांत सिमिलिपाल व्याघ्र प्रकल्पाला वन्यजीव संरक्षण, अधिवास व्यवस्थापन, मानव संसाधन आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ३२.७५ कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य मिळाले आहे. बंगळुरू येथील नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्सेस येथील पर्यावरणशास्त्रज्ञ उमा रामकृष्णन आणि त्यांचे विद्यार्थी विनय सागर यांच्या नेतृत्वाखाली २०२१ मध्ये एक अभ्यास करण्यात आला. 'ट्रान्समेम्ब्रेन एमिनोपेप्टिडेज क्यू' या जनुकामुळे वाघाच्या शरीराच्या वरच्या भागाचा रंग गडद होतो. सप्टेंबर २०२१ मध्ये 'प्रोसिडिंग्ज ऑफ द नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेस' या शोधपत्रिकेत याबाब एक अभ्यास प्रकाशित झाला आहे. या अभ्यासानुसार सिमिलिपाल व्याघ्र प्रकल्पातील वाघांची संख्या खूपच वेगळी आहे. इतर वाघांच्या तुलनेत त्यांच्यामध्ये जीन्सचा प्रवाह खूपच मर्यादित आहे. अशा वेगळ्या वाघांची संख्या नामशेष होण्यास अत्यंत संवेदनशील आहे. परिणामी व्याघ्र संवर्धनाच्या प्रयत्नांवर त्याचा परिणाम होऊ शकतो, असेही या अभ्यासात संशोधकांनी म्हटले आहे.

# प्रकाश आंबेडकरांच्या सभेच्या व्यासपीठाचा भाग कोसळला

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** वंचित बहुजन आघाडीतर्फे मनुस्मृती दिनानिमित्त सोमवारी नागपुरातील कस्तुरचंद पार्कवर स्त्रीमुक्ती दिन परिषदेचे आयोजन केले. मात्र, या सभेसाठी उभारलेल्या भव्य व्यासपीठाचा मागचा भाग (बॅकड्रॉप) लोखंडी अँगलसह अचानक कोसळला. हजारोंच्या गर्दी असलेल्या मैदानात या घटनेमुळे धावपळ झाली. सुदैवाने या घटनेत कुणीही जखमी झाले नाही. घटनेनंतर लगेच प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आणि छायाचित्रकारांनी व्यासपीठाकडे धाव घेतली. मात्र, या भागात चित्रिकरण करण्यास काही कार्यकर्ते प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना आठकाठी आणत होते. त्यामुळे या ठिकाणी मोठा गोंधळ उडाला होता.

या परिषदेला ॲड. प्रकाश आंबेडकर, वंचितच्या प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर आणि प्रदेश उपाध्यक्ष निशा शेंडे शहरात दाखल झाल्या होत्या. काँग्रेसच्या स्थापना दिनानिमित्त २८ ला जाहीर सभा आयोजित करण्यात आल्याने त्यापूर्वी वंचितने स्त्रीमुक्ती परिषद आयोजित करून शक्तिप्रदर्शन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी कस्तूरचंद पार्कवर भव्य असे व्यासपीठ उभारण्यात आले. गेल्या दोन दिवसांपासून व्यासपीठाचे काम सलग सुरु होते. सोमवारी सकाळी व्यासपीठाचे उर्वरित काम पूर्ण झाले. व्यासपीठावर बाळासाहेब आंबेडकर यांचे आगमन होण्यापूर्वीच व्यासपीठाचा मागचा भाग (बॅकड्रॉप) लोखंडी अँगलसह कोसळला. या घटनेचे चित्रिकरण करण्यास गेलेल्या प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधी आणि छायाचित्रकारांनी धाव घेतली असता काही कार्यकर्त्यांनी चित्रिकरण करण्यास मज्जाव केला. त्यानंतर काही वेळातच सुजात आंबेडकर यांनी व्यासपीठाच्या मागच्या बाजुला येऊन पाहणी केली.

# पंतप्रधान कुसुम सौर ऊर्जेला भामट्यांचे ग्रहण

## बनावट संदेशांद्वारे शेतकऱ्यांची फसवणूक

आधुनिक केसरी न्यूज


किरणकुमार आवारे

निफाड : शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी या हेतूने केंद्र सरकारने सुरू केलेल्या पंतप्रधान कुसुम सौर ऊर्जेला भामट्यांचे ग्रहण लागले असून हे भामटे बनावट संदेशांद्वारे शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याचे निदर्शनास आले आहे. वीजेचा तुटवडयामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी यासाठी प्रधानमंत्री कुसुम योजनेत शेतकऱ्यांना सौर ऊर्जेवर चालणाऱ्या कृषिपंप खरेदीसाठी अनुदान देण्यात येत आहे. प्रधानमंत्री कुसुम योजनेत शेतकऱ्यांना सौर ऊर्जेवर चालणाऱ्या तीन, पाच व साडेसात अश्वशक्ती कृषिपंपांसाठी अनुदान देण्यात येते. या योजनेला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद मिळत असून शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर अर्ज प्राप्त होत आहेत. मात्र पंतप्रधान कुसुम योजनेचे बनावट संकेतस्थळ व ॲपमधून शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होण्याच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. ज्यांनी या योजनेसाठी अर्ज केले आहेत, अशा शेतकऱ्यांची नावे व संपर्क क्रमांक भामट्यांकडून मिळवले जातात. त्यानंतर सदर अर्जदार शेतकऱ्यांना या योजनेत निवड झाल्याचे संदेश पाठवले जातात. या संदेशात शेतकऱ्याचा हिस्सा भरण्यासाठी लिंक दिलेली असते. या लिंकवर क्लिक केल्यानंतर या योजनेच्या अधिकृत वेबसाईट सारखीच बनावट वेबसाईट उघडली जाते. अधिकृत वेबसाईट प्रमाणेच हुबेहूब पैसे भरण्याची सुविधा या संकेतस्थळावर उपलब्ध असते. त्यानंतर शेतकऱ्यांना भूलथापा व लवकर प्रकरण मंजूर होण्याचे आमिष दाखवून तातडीने शेतकऱ्यांच्या हिस्स्याचे पैसे भरण्याचा आग्रह केला जातो. सर्वसाधारण प्रवर्गातील शेतकऱ्यांना ९० टक्के तर अनुसूचित जाती व अनूसचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना ९५ टक्के अनुदान मिळणार असे सांगितले जाते. त्यामुळे शेतकरी बळी पडतात. विशेष म्हणजे पंतप्रधान कुसुम योजनेचे अधिकृत संकेतस्थळाप्रमाणे बनावट संकेतस्थळ ही खरे दिसावे यासाठी चक्क पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे छायाचित्र वापरण्यात आले आहे. हे भामटे अत्यंत चलाखीने शेतकऱ्यांनी पैसे भरल्यानंतर अनुदानाची रक्कम खात्यात जमा झाल्याचा बँकेच्या नावाने बनावट मेसेज सुद्धा पाठवतात.



शेतकऱ्यांनी अधिकृत सेवा केंद्रातूनच अर्ज करावेत, खोट्या संकेतस्थळ व अविश्वासार्ह मोबाईल ॲपला भेट देऊ नये, तसेच फसव्या कॉलला बळी पडू नये, त्याच बरोबर अविश्वासार्ह संकेतस्थळांवर पैशाचा भरणा करू नये .
– हेमंत कुलकर्णी, विभागीय महाव्यवस्थापक महाउर्जा, नाशिक

महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळावरच या योजनेच्या लाभार्थ्यांच्या नावाची यादी प्रसिद्ध होत असते . आपल्या नावाची खात्री अधिकृत ठिकाणी करूनच, याच अधिकृत संकेतस्थळावरच, माहितगार व्यक्तीकडूनच शेतकऱ्यांनी पैसे भरावे .
– नारायण घोटेकर, आयकॉन सोलर इंस्टॉलर




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# वाचावी बहुतांची अंतरे



आधुनिक केसरी

केवळ दोन वर्षांचा असलेला प्रणाद त्याच्या आईवडिलांसोबत एका पुस्तक महोत्सवात गेला. तेथील एका स्टॉलवर असणारे आकर्षक छोटे पुस्तक पाहून हे पुस्तक मला पाहिजेच म्हणून त्याने हट्ट धरला आणि मग त्याच्या आईबाबांना ते पुस्तक घ्यावेच लागले. त्या लहानग्याला वाचता येत नव्हते पण पुस्तकातील रंगीबेरंगी चित्रांनी त्याला आकर्षित केले. माझ्या मते हा पुस्तकाचा सगळ्यात छोटा ग्राहक असावा आणि हेच पुणे येथे भरलेल्या पुस्तक महोत्सवाचे वेगळेपण आहे असे मला वाटते. आपल्या मुलांना अनेक ठिकाणे दाखवण्यासाठी आपण घेऊन जातो पण पालकांनी आपल्या मुलांना घेऊन या पुस्तक महोत्सवाला जरूर जावे असे मला वाटते आणि अनेक सुज्ञ पालक तसा लाभ आपल्या मुलांना मिळवून देत आहेत. आजच्या मोबाईलची क्रेझ असलेल्या जमान्यात आपल्या मुलांवर जर वाचनसंस्कार करायचा असेल तर असे हे पुस्तक महोत्सव त्यांना दाखवायलाच हवे. ही आधुनिक पर्यटनाची ठिकाणे समजावीत. अनेक शाळा देखील या ठिकाणी आपल्या विद्यार्थ्यांना हा पुस्तक महोत्सव दाखवण्यासाठी घेऊन येताहेत. या पुस्तक महोत्सवात येणाऱ्या रसिकाला आश्चर्याचा सुखद धक्का बसतो. आल्याबरोबर त्याचा मोबाईल क्रमांक आणि नाव लिहून घेतले जाते आणि त्याला दोन सुंदर पुस्तकांची भेट दिली जाते. पुस्तक महोत्सवातून हा रसिक वाचक भलेही पुस्तक खरेदी करेल किंवा नाही हे सांगता येणार नाही, पण बाहेर पडताना आपल्या सोबत तो दोन पुस्तके मात्र नक्की घेऊन पडतो आणि सोबतच हृदयात साठवलेले पुस्तक महोत्सवाचे दृश्यही. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या विशाल प्रांगणात भरलेल्या या महोत्सवात आल्याबरोबरच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यार्थी विद्यार्थिनी आपले स्वागत करतात आणि आपल्या हातात एक पुस्तक देऊन एक परिच्छेद वाचायची विनंती करतात. यातूनच एक नवा आणि चौथा विश्वविक्रम प्रस्थापित झाला आहे. तो म्हणजे ' लार्जेस्ट ऑनलाईन अल्बम ऑफ पीपल रिडींग सेम पॅराग्राफ ऑफ मिनिमम ड्युरेशन ऑफ थर्टी सेकंड्स ' या अभियानाअंतर्गत तब्बल अकरा हजार पेक्षा जास्त लोकांनी एकाच पुस्तकातील एकच परिच्छेद वाचला आणि हा एक अनोखा विश्वविक्रम **क्रमशः**

# आनंदी पहाट



## आनंदाचे स्वरूप व्यापक आणि समाधान देणारे असते

आधुनिक केसरी

आनंदाचे व्यापक स्वरूप पूर्णपणे भावनिक नाही, तथापिः त्यात एक संज्ञानात्मक घटक देखील आहे. जेव्हा आनंदी लोकांना त्यांच्या जीवनातील परिस्थिती आणि घटनांचा विचार करण्यास सांगितले जाते, तेव्हा ते या परिस्थितीत घटनांचे सकारात्मक मूल्यांकन करतात. आनंदी लोक त्यांच्या जीवनात आणि त्यांच्या जीवनातील विविध क्षेत्रांमध्ये समाधानी नसल्याची तक्रार करतात. एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात एकतर संकुचित अर्थाने, एखाद्या विशिष्ट क्षणी चांगल्या गोष्टी घडतात, तेव्हा त्याच्या जीवनाचे आणि एकूणच कर्तृत्वाचे सकारात्मक मूल्यमापन होत असते. व्यक्तिनिष्ठ कल्याण करणारा आनंद हा नकारात्मक भावनांपासून (जसे की दुःख, भीती आणि राग) आणि इतर सकारात्मक भावनांमधून (जसे की आपुलकी, उत्साह आणि स्वारस्य) या दोन्हींमधून वेगळे केले जाऊ शकतेच असे नाही. ही भावना सहसा चेहऱ्यावरील विशिष्ट भावासह उद्‌भवते. जगभरातील लोक आनंदाची एक समान संकल्पना बाळगतात आणि ते इतरांमधील आनंद ओळखू शकतात. परिणामस्वरुप, आनंदाच्या विशिष्ट भावनांचा सहसा काही मूलभूत भावनांपैकी एक म्हणून समावेश केला जातो. ज्यांना अधिक मूलभूत भावनांमध्ये विभागले जाऊ शकत नाही आणि त्या इतर, अधिक जटिल भावना तयार करण्यासाठी एकत्रित होऊ शकतात. खरं तर, ती कधीकधी एकमेव असते, सकारात्मक भावना जी मूलभूत मानली जाते. अशा प्रकारे, भावनांचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांसाठी आनंद ही एक महत्त्वाची संकल्पना आहे. संशोधनाचे एक संपूर्ण क्षेत्र व्यक्तिनिष्ठ कल्याणाच्या अधिक समावेशक संकल्पनेभोवती विकसित झाले आहे, जे विशिष्ट क्षणिक भावनांऐवजी आनंद-संबंधित घटनांच्या विस्तृत संग्रहाद्वारे वैशिष्ट्यीकृत आहे. एखाद्याच्या अपेक्षेप्रमाणे, जे लोक अशा प्रकारे आनंदी असतात, त्यांना वारंवार सकारात्मक भावना आणि क्वचित नकारात्मक भावनांचा अनुभव येतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## परमार्थ करावा | हळुवार ||

टाळाचिया संगे | बोले मन माझे ||
संसाराचे ओझे | दूर झाले ||१||
थाटला संसार | अभंगाच्या दारी ||
आता तूचि तारी | पांडुरंगा ||२||
नामाचा गजर | पडताच कानी ||
बोले संतवाणी | काळजात ||३||
कर्माच्या संगती | जगण्याचे हीत ||
सूरमयी गीत | प्रारब्धाचे ||४||
पा-पुण्य सार | भावार्थी जाणावा ||
परमार्थ करावा | हळुवार ||५||




# निरुपण

आधुनिक केसरी

पती अवघीच मोडली ।वस्तभाव गाहाण पडिली ।
अहा देवा वेळ आली ।आतां डिवाळ्याची ॥१२॥
कांहीं केला ताडामोडा ।विकिला घरींचा पाडारेडा ।
कांहीं पैका रोकडा ।कळांतरें काढिला ॥१३॥
ऐसें रुण घेतलें ।लोकिकीं दंभ केलें ।
सकळ म्हणती नांव राखिलें ।वडिलांचें ॥१४॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अधर्म प्रवृत्त इच्छा बुरे,
मन में होय न कोय ।
मन निग्रह सत्मार्ग रत, कहत बुद्ध शम
सोय ।।१३५।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल
षष्ठ अध्याय) ०६/०६/१३५
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
अधर्माप्रती लगाव नसणे आणि मनात कुठलाही वाईट भाव न येणे तसेच मनाला आपल्या नियंत्रणात ठेऊन सत्य मार्गावर साधक स्थिर राहाणे, याला विवेकी लोक शम असे म्हणतात.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# आशंकानिरूपण

आधुनिक केसरी

बुध्दीः ही नः प्रमाणं सदसतो याथात्म्यावगमे**| सत् आणि असत्य आत्मा आणि अनात्मा यांचे वर्णन समजण्यासाठी प्रमाण काय आहे ?असं जर समजून घ्यायचं झाले तर त्यासाठी आपल्या जवळ बुध्दी असणे गरजेचे आहे. वस्तु कोणत्याही प्रकारची असो,तिचा अनुभव आल्याशिवाय आपल्याला समजत नाही. बर्फ व दगड दोन्ही शेजारी शेजारी ठेवले व बर्फाला हात लावला तर गार लागेल. ,दगड हातात घेतला तर आपण समजू शकतो की हा दगड आहे. म्हणजे आपली बुद्धी हेच अनुभवाचे साधन आहे.पण बुध्दीला ज्या मर्यादा असतात त्याच अनुभवायला मर्यादा घालतात. स्थळकाळाच्या चौकटीत चालणारी ही बुद्धि जेव्हा ब्रम्हस्वरूपाचा विचार करते तेव्हा ती सांगते की, ब्रम्हाच्या ठिकाणी,काळाची धारा वाहात नाही. स्थलाचा विस्तार नाही आणि कारण कार्यता नाही.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# नाम निष्ठेने घ्यावे

आधुनिक केसरी

नाम श्रद्धेने घेणे म्हणजे काय ? तर आपल्या गुरूने, किंवा ज्याच्याबद्दल आपली पूज्य भावना असते अशा व्यक्तीने, सांगितले म्हणून घेणे. अशा श्रद्धेने नाम घेणाऱ्याच्या मनात शंका येत नाही. ही स्थिती फार भाग्याची, पण तितकीच दुर्मिळ. निष्ठेने नाम घेणे म्हणजे शंकारहित नाम घेणे. शंका अनेक तऱ्हेच्या असतात. नाम घेताना भगवंताकडे लक्ष नसले तर त्या नामाचा उपयोग आहे की नाही, नाम घेताना बैठक कोणती असावी, दृष्टी कशी असावी, शुचिर्भूतपणेच नाम घ्यावे किंवा कसे, अशा तऱ्हेच्या अनेक शंका मनात येतात. थोडक्यात असे म्हणता येईल की, आपण जे नाम घेतो ते भगवंतापर्यंत पोहोचते की नाही, ह्या एका शंकेत सर्व शंकांचा समावेश होतो. भगवंत आणि त्याचे नाम एकरूपच असल्याने त्या दोहोंच्या आड काहीच येऊ शकत नाही. एखाद्या व्यक्तीच्या पाठीमागून आपण चाललो असताना आपल्या तोंडून त्याचे नाव उच्चारले गेले तर तो लगेच मागे वळून बघतो. ही जर मनुष्याची स्थिती, तर भगवंताच्या बाबतीत त्याचे नाव त्याच्यापर्यंत



पोहोचत नाही हे कसे शक्य आहे ? खरे पाहिले तर भगवंताचे नाव त्याच्याच कृपेने आपल्या मुखात येते; म्हणजे त्याचे नाव तोच घेत असतो; मग नाम भगवंतापर्यंत पोहोचते की नाही ह्या शंकेला वावच कोठे राहिला ? समजा, दोन माणसे जेवायला बसली. त्यांतल्या एकाच्या मनात काही विचार घोळत असून त्याचे जेवणाकडे लक्ष नव्हते, पण हाताने तोंडात एकेक घास घालण्याचे काम चालू होते. दुसरा इसम मात्र लक्षपूर्वक जेवण जेवीत होता. दोघेही जेवून उठले. ह्यात उपाशी कोण राहिला ? दोघांचीही पोटे भरलीच ! तसे, नाम घेतल्यानंतर त्याचा उपयोग झाला नाही असे कसे होईल ? समजा, आपण परगावच्या एका अनोळखी इसमाला पत्र लिहून त्याला बोलाविले; तो आला, आणि त्याने सांगितले की, ' तुम्ही ज्याला पत्र पाठविले तोच मी ', तर त्याच्या वचनावर विश्वास ठेवून आपण त्याला जवळ करतो. तसे, भगवंताने सांगितले आहे की, ' जेथे माझे नाम तेथे मी पुरुषोत्तम '; तर मग या वचनावर विश्वास ठेवून नाम घ्यावे आणि त्यातच त्याला पहावे, असे का करता येऊ नये ? हीच श्रद्धा. आपण ज्याचे पोटी जन्माला आलो त्याचेच नाव आपण आपल्या नावापुढे लावतो, तसे भगवंताच्या बाबतीत करावे. त्याचेच नावाने जगावे; म्हणजे माझा सर्व कर्ता, रक्षिता, तो एकच असून, त्याच्याशिवाय माझे या जगात दुसरे कोणीही नाही, या भावनेने राहावे. असा जो भगवंताचा होतो, त्याचे महत्त्व भगवंत स्वतःपेक्षाही जास्त वाढवतो.

**१८. नामाने भगवंताची प्राप्ती होणार ही खात्री असावी. अशा नामालाच ' निष्ठेचे नाम ' असे म्हणतात.**

# जनार्दन स्वामी

आधुनिक केसरी

बाबाजींनी भक्तां करता ४ अमृत तत्व सांगितली आहे, ती अशा प्रकारे – पर धन, पर स्त्री, पर अन्न आणि पर निंदा या चार गोष्टींचा त्याग हीच यशस्वी जिवनाची गुरुकिल्ली. संपूर्ण विश्वाने ,विश्वासाने आणि आदराने नतमस्तक व्हावे अशी अतिशय दिव्य संस्कृती भारतात आहे.आजही असे दिव्य संस्कार ,दिव्य संत महापुरुष ,दिव्यज्ञान आणि दिव्य ग्रंथावली भारतात सहज सुलभतेने प्राप्त होते हि वस्तुस्थिती आहे.त्याच दिव्यसंत परंपरेतील एक अलौकिक अर्वाचीन महर्षी म्हणजेच निष्काम कर्मयोगी भगवान श्री राष्ट्रसंत सद्‌गुरू जनार्दन स्वामी (मौनगिरी) महाराज. जनसामान्यांना जडवादांच्या जीवनदृष्टीतून जागे करण्याचे महतकार्य जनार्दन स्वामींनी जन्मभर जाणीवपूर्वक जोपासलेले आहेत.दिनांक २४ सप्टेंबर १९१४ रोजी महाराष्ट्रातील मराठवाड्यातील पुण्यभूमीत सर्व सामान्य शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेल्या जनार्दन स्वामींचे अंगी श्रद्धा,शुचिता ,अस्मिता, द्या,प्रेम,परोपकर ,क्षमा अशा दैवी गुणांचे दर्शन त्यांच्या बालपणीच्याच आचार -विचारावून सर्वांना समजले होते.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, २६ डिसेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari



जेजुरी येथील कुलदैवत खंडोबा देवाचे उपाध्ये पुजारी हरिश्चंद्रे परिवाराचे ख्यातनाम कडेपठार शिवबाबा महाराज यांच्या हस्ते जयाद्री दत्तमंदिर कलशारोहण समारंभ पार पडला. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# आमच्या काळात बंड नव्हते, आम्ही बसून निर्णय घ्यायचो

## शरद पवार : मी नव्या लोकांना प्रोत्साहन देण्याची काळजी नेहमी घेतली

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मी नव्या लोकांना प्रोत्साहन देण्याची नेहमी कळाजी घेतली. मात्र, हे खरे आहे की गेल्या १० ते १५ वर्ष मी बारामतीत लक्ष घातले नाही. मी कधीच कुठला निर्णय घेतला नाही. निर्णय घेतल्यानंतर त्याची कुठलीच तक्रार नसायची. आमच्या काळात बंड नव्हत आम्ही बसून निर्णय घ्यायचो असे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटले आहे. पुण्यातील भीमथडीचे प्रदर्शन पाहण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

शरद पवार म्हणाले की, आमचे बंड नव्हते. आम्ही बसून निर्णय घेतला होता. यशवंतराव चव्हाण यांची विचारधारा लक्षात घेऊन आम्ही निर्णय घेतला. सर्वांनी बसून निर्णय घतेला होता. त्याबद्दल कुणी तक्रार करण्याची गरज नाही. आज कोणी काही केले असेल तर त्याबद्दलही तक्रार करण्याची गरज नाही. फक्त पक्षाची निर्मिती कशी झाली? पक्षाचा संस्थापक कोण आहे? हे सर्वांना माहीत आहे. त्यामुळे त्यावर भाष्य करण्याची गरज नाही, असे शरद पवार साहेब म्हणाले.

शरद पवार म्हणाले की, गेली १० ते १५ वर्ष बारामती आणि त्या भागात माझे लक्ष असत नाही. साखर कारखाना आणि अन्य संस्थांच्या पदावर कुणी जावे आणि कुणी जबाबदारी घ्यावी यात मी लक्ष घातले नाही. गेल्या दहा वर्षात एकाही गोष्टीत मी लक्ष दिले नाही. त्यामुळे कुणालाही काम करण्यात अडचण आणण्याची भूमिका घेतली नाही. परिसराचा नाव लौकिक वाढेल याची काळजी घ्यावी, असे शरद पवार साहेब म्हणाले. कुणी कुणाचे ऐकावे. हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. पक्ष म्हणून मी नेहमी नव्या लोकांना संधी देण्याची काळजी घेतली. यात मला आनंद आहे, असेही पवार म्हणाले.

पवार म्हणाले की, इथेनॉलचे उत्पादन वाढवावे अशी मागणी सर्वांची आहे. देशात वाहने वाढत आहेत. त्यामुळे त्याचे उत्पादन वाढवणे गरजेचे आहे. इथेनॉलला आम्हीदेखील प्रोत्साहन दिले. पण आत्ताच्या केंद्र सरकारच्या नितीमध्ये कमतरता असल्याचे शरद पवार साहेब म्हणाले. याबाबत काही गोष्टी शिल्लक असून, आपण स्वतः मोदी आणि शहा यांना लोकांचे म्हणणे पाठवले असल्याचे पवारांनी यावेळी सांगितले.

पवार पुढे म्हणाले की, सर्व्हे नेहमी येत असतात. त्यात ते अनेकवेळा खरे खोटे असतात. आताच पाच राज्यातील विधानसभेच्या निवडणुका झाल्या. त्याचे सर्व्हे वेगळे आकडे सांगत होते. पण प्रत्यक्षात लोकांनी अंतिम निकाल वेगळा दिला. त्यामुळे सर्व्हेवर अवलंबून राहून कुणी निष्कर्ष काढू नये असेही शरद पवार साहेबांनी यावेळी स्पष्ट केले. इंडियाच्या बैठकीत मी स्वतः खर्गे यांना प्रकाश आंबेडकर यांना आपल्यासोबत घेतले पाहिजे असे सांगितल्याचेही शरद पवार साहेब म्हणाले. पुढे शरद पवार म्हणाले की, क्रीडा मंत्रालायने भारतीय कुस्ती परिषदेची नवी बॉडी निलंबित करण्यास उशीर केला. त्यांनी यापूर्वीच हे करायला हवे होते.



# बृजभूषण सिंह यांना धक्का

आधुनिक केसरी

स्पर्धा आयोजित करताना नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी भारतीय कुस्ती महासंघाची कार्यकारणी क्रीडा मंत्रालयाने बरखास्त केली आहे. तसेच, नवनियुक्त अध्यक्ष संजय सिंह यांचेही निलंबन करण्यात आले आहे. याप्रकरणी महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांनी प्रतिक्रिया दिली आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता कार्यकारिणी समितीची बैठक बोलावण्यात आली. राष्ट्रीय स्पर्धा तातडीने आयोजित करण्यात आली आणि स्पर्धा आयोजित करताना नियमांचे पालन केले नसल्याचा ठपका ठेवत केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने भारतीय कुस्ती महासंघाची कार्यकारिणी बरखास्त केली. तसेच, बृजभूषण शरण सिंह यांच्या मतदारसंघातील नंदिनीनगर येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याने साक्षी मलिकसह अनेक खेळाडूंनी नाराजी व्यक्त केली होती.  सर्व पार्श्वभूमीवर क्रीडा मंत्रालयाने कारवाई केली. या कारवाईवर बृजभूषण शरण सिंह म्हणाले, संजय सिंह हे माझे निकटवर्तीय नाहीत. जुन्या कमिटीला तत्काळ एक निर्णय घ्यावा लागला. अंडर २० आणि अंडर १५ च्या राष्ट्रीय स्पर्धांबाबत. ३१ डिसेंबरला त्यांचे सत्र समाप्त होईल. त्यानंतर हे टुर्नामेंट संपत आहे. त्यामुळे त्यांचे एक वर्ष वाया जाईल. यामुळे महासंघातील सर्व सदस्यांनी मिळून हा निर्णय घेतला. कोणत्याही परिस्थितीत खेळाचे वातावरण सुरू व्हावं, याकरता हा निर्णय घेण्यात आला होता. येत्या ४-५ दिवसांत स्पर्धेची व्यवस्था करण्यास महासंघाच्या एकाही सदस्याने सकारात्मकता दाखवली नाही. त्यामुळे ही स्पर्धा नंदिनी नगरमध्ये आयोजित करण्याचे ठरवले. हे ज्या बैठकीत ठरवले गेले, त्यावेळी माझा निवृत्तीचा कार्यक्रम होता. त्यामुळे मीही तिथे होतो. परंतु, १५ आणि २० वर्षीय मुलांचं वर्ष वाया जाऊ नये, याकरता नंदिनी नगर येथे स्पर्धेचे आयोजन करण्यात आलं होतं. यासाठी महासंघातील २५ सदस्यांनी लिखित आणि मौखिक संमती दिली होती, असंही बृजभूषण सिंह म्हणाला. मी कुस्ती सोडली आहे. पण काल रात्रीपासून मला काळजी वाटत आहे, त्या ज्युनियर महिला कुस्तीपटूंची. ते मला फोन करून सांगत आहेत की २८ तारखेपासून ज्युनियर राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा होणार आहे आणि नवीन कुस्ती महासंघाने ती घेण्याचे ठरवले आहे नंदनी नगर गोंडामध्ये. गोंडा हे ब्रिजभूषणचे क्षेत्र आहे. आता कल्पना करा कोणत्या वातावरणात ज्युनियर महिला कुस्तीपटू तिथे कुस्ती खेळायला जातील? या देशात नंदनीनगर व्यतिरिक्त कुठेही स्पर्धा घेण्यास जागा नाही का? काय करावे समजत नाही, अशी एक्स पोस्ट साक्षी मलिकने काल (२३ डिसेंबर) पोस्ट केली होती. मी विमानात होतो, त्यामुळे मला या निर्णयाची माहिती नाही. माझ्यापर्यंत अद्याप पत्र पोहोचलेले नाही. मी आधी पत्र पाहून घेईल आणि मगच या विषयावर बोलेण. माझ्या ऐकिवात आले की, मला फक्त काम करण्यापासून रोखण्यात आले आहे. कोणतेही निर्णय घेऊ नका, असा निरोप देण्यात आला आहे, असे संजय सिंह म्हणाले.

# महाविकास आघाडी लवकरच फुटणार ?


राम कुलकर्णी, संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**वर्तमान लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर राज्यात सारेच पक्ष संघटनात्मकदृष्ट्या कामाला लागले असुन उबाठा अर्थात ठाकरे शिवसेना 23जागा लढवणारच यावर ठाम आहे. त्याहुन अधिक सांगायचे झाले तर खा.संजय राऊत जागा वाटपाच्या निर्णयात महाराष्ट्र काँग्रेसला नगण्य समजत असुन दिल्लीतुन निर्णय होणार असल्याचे म्हणतात. दुसरीकडे राज्यातील काँग्रेस नेते राऊतांच्या बोलण्याकडे लक्ष्य द्यायला तयार नाहीत.**

2024 साठी राज्यात आता महाविकास आघाडीत मोठ्या प्रमाणावर समीकरण बदलले असुन शिवसेना आणि राष्ट्रवादी दोन्ही पक्ष फुटले सद्यस्थितीत काँग्रेस स्वतःला तरी मजबुत समजत असुन अद्याप तरी त्यांच्यात फुट पडली नाही? पण पडणार नाही असेही नाही. या सर्व पार्श्वभुमीवर काँग्रेस पक्षाला सर्वाधिक जागा लढाव्याच लागत्याल त्यांनी तशी तयारी चालु केली. उबाठा शिवसेना एकही जागा जिंकेल लोकसभेची अशी परिस्थिती नाही तर राष्ट्रवादी एकत्र असताना अवघ्या 03 जागा जिंकुन मैदानात होती तर आता त्यांचीही अवस्था गलितगात्र आहे. कदाचित काँग्रेस पक्ष स्वतंत्र 48 जागा लढवेल तर नवल वाटणार नाही. तशा प्रकारची अंतर्गत व्युह रचना पक्षात चालु असुन स्थापना दिनाच्या अगोदर महाविकास आघाडीत निश्चित फुट पडु शकते? वर्तमान लोकसभा निवडणुका फेब्रुवारी महिन्यात निश्चित जाहिर होतील. 17 मेच्या अगोदर देशाच्या पंतप्रधानाचा शपथविधी होवु शकतो. त्या दृष्टीने देशातील सर्वच पक्ष कामाला लागले असुन घमेंडी आघाडीची दिल्लीत झालेली तिसरी बैठक तशी पहाता निष्फळ म्हणावी लागेल. दुसरीकडे भाजपा महाविजय 400 पार यासाठी कंबर खेचुन कामाला लागलेला दिसतो. मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगड किंवा इतर राज्यात भाजपाला मिळालेले यश खऱ्या अर्थाने लोकसभेची नांदी म्हणावी लागेल. कारण हे राज्य भाजपाच्या ताब्यात जाणार नाही अशा प्रकारे घमेंडीतील पक्ष नेत्यांचा दावा होता. अगदी प्रसार माध्यमाने देखील तशा प्रकारचा धोका देणारा अंदाज वर्तविला होता. पण घडले निराळेच. विजय हाती येताना एकतर्फी कमळाच्या हातात हे राज्य आली. तदनंतर पक्षात आणि कार्यकर्त्यात उत्साह वाढणे साहजिकच. एक गोष्ट खरी आहे ती म्हणजे भाजपा ग्रामपंचायतीच्या निवडणुका देखील सहज घेत नाही. येणारी निवडणुक तर लोकसभेची असुन देशाच्या पंतप्रधान पदावर तिसऱ्यांदा नरेंद्रजी मोदी यांना विराजमान करण्यासाठी गल्लीतला पक्ष कार्यकर्ता आतापासुन कामाला लागलेला दिसतो. राज्यात भाजपा शिंदे आणि पवार गट यांच्याशिवाय इतर काही घटक पक्षाची महायुती असुन जागा वाटपात एकवाक्यता दिसुन येते. दुसरीकडे मात्र महाविकास आघाडी निश्चित फुटीच्या उंबरठ्यावर वाटचाल करताना दिसते. त्याचे कारण म्हणजे उबाठा गटाने 23 जागा लढवण्याचा निर्णय घेतला आहे. अनेक वर्षापासुन एवढाच आकडा लोकसभेला त्यांच्यासाठी शुभशकुन म्हणावा लागेल. संजय राऊतांनी तर आम्ही 23 जागाच लढवणार. एवढेच नाही तर महाराष्ट्र काँग्रेस नेत्यांना नगण्य समजुन जागा वाटपाचा निर्णय दिल्लीमध्येच होईल असे सांगितले. विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी संजय राऊतांच्या बोलण्याकडे कानाडोळा लागले होते. आता अजितदादा पवारांच्या माध्यमातुन मोठा गट सत्ताधारी पक्षात गेला आहे. त्यामुळे शरद पवार गटाची राष्ट्रवादी पक्षाची अवस्था देखील कमजोर झाली यात शंका नाही. 48 पैकी शरद पवार गटाच्या राष्ट्रवादीला किती जागा द्यायच्या? हा सारा संभ्रम काँग्रेस पक्षात सद्या चर्चेचा विषय दिसतो. घटक पक्ष म्हणुन वाढीव जागा उबाठा तथा पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाला निर्णय केंद्रात होतील असा अंदाज व्यक्त करून राऊतांनी राज्य काँग्रेसला साईड ट्रॅक केल्याचे लक्षात येते. ही सर्व पार्श्वभुमी पहाता काँग्रेस स्थापना दिन पुढच्या आठवड्यात साजरा करतेय. नागपुरला मोठे शक्तीप्रदर्शन होण्याची शक्यता पण त्या अगोदरच जागा वाटपावर अंतिम चर्चा झाली तर निश्चित महाविकास आघाडीला मोठे भगदाड पडू शकते हे मात्र नक्की.



केला असला तरी जागा वाटपावरून निश्चितच ठिणगी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. 2019 ला राज्यात सत्तेवर येण्यासाठी काँग्रेसनं मुळ शिवसेनेला पाठिंबा दिला हे खरं. मात्र मुळ शिवसेना महाविकास आघाडीच्या माध्यमातुन सत्तेवर आल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे 40 आमदारांना सोबत घेवुन बाहेर पडले. परिणामी सत्ताधारी पक्षात गेले. शिंदे शिवसेना आणि ठाकरे शिवसेना यांच्यात आता संघटनात्मक वाद सुरू असुन मुळची शिवसेना फुटल्यानंतर ठाकरे शिल्लक शिवसेनेची अवस्था  सद्या तरी अत्यंत केविलवाणी अवसान गलितगात्र होवुन बसली त्यात शंका नाही. 23 पैकी एकही जागा लोकसभेची ठाकरे शिवसेनेच्या हाती लागेल याची खात्री मातोश्रीतुनसुद्धा देणे सद्यस्थितीत अशक्य. त्यामुळे त्यांना 23 जागा देवुन उपयोग काय? अशा प्रकारची पुर्वसुत्र व्युहरचना राज्य काँग्रेस पक्षात सद्या तरी सुरू असलेली दिसते. विनाकारण आपल्यातला कोठा उबाठा गटाला द्यायला काँग्रेस पक्षातील नेते तयारच नाहीत. दुसरीकडे महाविकास आघाडी स्थापना करताना शरदचंद्र पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष देखील सोबत होता. 2019 ला लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादीला देखील केवळ दोन-तीन जागेवरच समाधान मानावे दिल्या तर त्याचा उपयोग निश्चित होणार नाही याची खात्री प्रदेश अध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, अशोकराव चव्हाण या साऱ्या मंडळीला आहे. शिवाय महाराष्ट्रात सद्या तरी एकमेव काँग्रेस पक्ष महाविकास आघाडीतला ज्या पक्षात फुट झालेली नाही. उद्या शक्यता नाकारता येत नाही. सहकारी घटक पक्षात पडलेली फुट आणि काँग्रेस पक्षात असलेली एकवाक्यता त्यामुळे साहजिकच 30 पेक्षा जास्त जागा लोकसभेला राज्य काँग्रेस महाविकास आघाडी अभेद राहिली तर लढवल्याशिवाय रहाणार नाही. उबाठा गटाला देखील 23 आकड्यावर पाणी सोडावे लागणार. 10 ते 12 जागा एवढ्याच काँग्रेस त्यांना देवु शकते. शरद पवारांच्या राष्ट्रवादीला 05 पेक्षा जास्त जागा मिळण्याची सुतराम शक्यता नाही. कारण राष्ट्रवादी एक असताना मागच्या वेळी केवळ 03 जागेवर त्यांना विजय मिळाला होता. या साऱ्या गणिताचा काँग्रेस पक्षात वजाबाकीचा हिशोब राजकियदृष्ट्या सद्या सुरू दिसतो. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे उबाठा गटाचे नेते खा. संजय राऊत राज्यातील काँग्रेसला नगण्य स्थान देवु पहातात. त्याचे कारण अलीकडे राहुल गांधींच्या सोबत राऊतांची वाढलेली मैत्री त्यामुळे जागा वाटपाचे सारे महाविकास आघाडीतल्या घटक पक्षाची अजुन एक राजकिय बनवाबनवी समोर आल्याने शरद पवार गटाच्या कार्यकर्ता नेत्यांमध्ये नाराजी पहायला मिळते. त्याचे कारण उबाठा गटाचे नेते खा.संजय राऊतांनी 2021 मध्ये राज्यात सत्तेत असताना युपीएचे नेतृत्व शरद पवारांनी करावं यासाठी राष्ट्रीय स्तरावर मोर्चेबांधणी केली होती. एवढेच नाही तर देशाच्या पंतप्रधान पदावर शरदचंद्र पवार विराजमान का होवु नये?असाही सवाल केला होता. पण काल दिल्लीत घमेंडीया बैठक झाली. त्यात पंतप्रधान पदाच्या चेहऱ्यासाठी शरद पवारांच्या नावाचा चिक्कार शब्द उबाठा नेते उद्धव ठाकरे यांनी देखील काढला नाही. याउलट मल्लिकार्जुन खरगेंच्या नावाला सहमतीच्या टाळ्या देत पसंती दिली. राहुल गांधी यांच्यावरचा राग काढण्यासाठी ममता बॅनर्जीनं पंतप्रधान पदासाठी मल्लिकार्जुन खरगेंचे नाव सुचवले मग शरद पवारांचं किमान नाव सुचवायला उबाठा गटाचे दात पडले होते का? असा सवाल आता शिल्लक राष्ट्रवादी पक्षातील नेते आणि कार्यकर्ते उबाठाला जाहिरपणे विचारू लागले. ही सर्व पार्श्वभुमी पहाता लवकरच महाराष्ट्र महाविकास आघाडीत फुट पडल्याशिवाय रहाणार नाही हे त्रिवादी सत्य वाटते.

# ग्रंथांशी मैत्री झाली तर विचारांची आराधना सफल होते


गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**ग्रंथाशी मैत्री सहजासहजी होत नाही पण एकदा झाली तर विचारांची आराधना सफल झाल्याशिवाय राहत नाही.वैचारिक कुषोषण दुर होऊन मन बुद्धी ची सुदृढ अवस्था निर्माण होण्यासाठी ग्रंथातील पोषक तत्व जीवनावश्यक असून ते योग्य वेळी भरपूर प्रमाणात स्वीकारलेच पाहिजे.जीवन सुत्र ज्या विचारांवर आधारित असत ते अनमोल विचार ग्रंथ रूपी खाणीतून आपल्याला शोधून आपला उत्कर्ष करावा लागतो. ज्याला ग्रंथ रूपी खाणीतून विचारांचे अनमोल रत्न यशस्वी शोधता आले त्याच आपसुकच हित होत.ज्ञान,विज्ञान,तत्त्वज्ञान याच अनमोल भांडार हे ग्रंथ रूपाने ज्ञान प्रकाश संग्रहित केलेला असतो. ग्रंथाशी मैत्री म्हणजे जीवनाचा उद्धार हे वास्तव असलं तरी देखील सहजासहजी कोणीही ग्रंथा सोबत मैत्री करत नाही हे वास्तव नाकारता येणार नाही.**

मात्र ज्याने ग्रंथा सोबत मैत्री करून विचारांची साधना यशस्वी केली त्याच कल्याण झाल्याशिवाय रहात नाही.ज्ञान,विज्ञान,तत्त्वज्ञान यांचा अनमोल ठेवा संग्रही ठेवत शब्द बद्ध करणारं विचार सुत्र तत्त्व म्हणजे ग्रंथ असून ज्ञान प्रकाश अंखडीतपणे पिढ्यांन पिढ्या तेवत ठेवण्याचे कार्य ग्रंथाच्या माध्यमातून होत असत.मानवी जीवनाचा अनमोल ठेवा जपून ठेवत कित्येक पिढ्यांना ज्ञान प्रकाश उपलब्ध करून देऊन वाट दाखवणारे वाटाडी हे ग्रंथ असून ज्ञानाचा ठेवा खजाना म्हटलं तरी अनुचित ठरणार नाही.आपल्या पुर्वजांनी तो आपल्या साठी ठेवलेला खास अनमोल ठेवा आहे त्याची अनुभूती घेऊन लाभ घेण्यासाठी ग्रंथ सोडता इतर कोणताही प्रभावी मार्ग सृष्टीवर उपलब्ध नाही. आपण मात्र याला फार गांभीर्याने घेत नाहीत.ज्ञान अर्जन हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे पण सध्या गुगल संस्कृती उदयास आली असल्याने वाचना प्रति फार कोणालाही ऋची राहिलेली नाही हे वास्तव नाकारता येण्यासारख नाही.विचारांची आराधना यशस्वी होण्यासाठी ग्रंथाशी मैत्री होण गरजेच असत.जीवनाची दशा आणि दिशा बदलण्याची ताकद क्षमता हि फक्त ग्रंथात असते.सध्या ज्या पद्धतीने झपाट्याने सामाजिक सांस्कृतिक बदलतं चालली आहे त्या पद्धतीने वाचन संस्कृती संपुष्टात येत आहे. फार कमी प्रमाणात लोकांना वाचनाची आवड आणि सवय उरली आहे.बाहुतांश लोकांना वाचनाची आवड उरली नसल्याने परिणाम स्वरूप ज्ञान तत्त्वज्ञान जे ग्रंथात दडलेले आहे त्या पासुन आपण वंचित राहतोय आणि त्याचा थेट परिणाम वैचारिक दृष्ट्या कुपोषित रहायचं नसेल तर ज्ञानाच पोषक तत्व स्वीकारलं पाहिजे.जीवन यशस्वी होण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत विचारांची साधना यशस्वी व्हावी लागते.जीवन पैलतीरावर जाण्यासाठी अथवा जीवन हितार्थ विचार हे आपल्या ग्रंथ रूपी अनमोल खजान्यात शोधावे लागतात. शोधण्याची तसदी घेयची कशाला या विचारांची पिढी उदयास येत असल्याने वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे.परिणामी ग्रंथाशी मैत्री उरेल कशी तसं पाहिलं तर ग्रंथा सारखा प्रामाणिक मित्र जगात इतर दुसरा कोणीही नाही आपण आपल्या जीवनात ग्रंथा सोबत असणारी मैत्री ईमाने इतबारे निभावली तर जीवनाचा उत्कर्ष झाल्याशिवाय राहणार नाही.पण हि प्रामाणिकता आपण बाळगत नाहीत म्हणून आपली वाटचाल दुर्गती कडे होऊ घातलेली आहे पण याच आपल्याला कोणत्याही प्रकारचा गांभीर्य नाही हे दुर्दैव आहे असंच काहीसं चित्र सध्या तरी दिसत आहे.वेळ पुर्णपणे अजून गेलेली नाही परस्थिती पुन्हा आपल्या नियंत्रणात येऊ शकते आपली इच्छा शक्ती धेय्य शक्ति मजबूत असेल तर हि परस्थिती बदलू शकते.जीवनात कठिण अवघड असं काहिच नसतं.मुळ संकल्पना आणि महत्व समजणं गरजेचं आहे.आपल जीवन घडण्यासाठी जीवनात अमुलाग्र बदल परिवर्तन घडवून येण्यासाठी विचारांची नितांत आवश्यकता आहे आणि हेच परिवर्तन घडवून आणणारे अनमोल विचार हे ग्रंथाचं योगदान असतं. आपल खरं हित कशात आहे हे न कळल्यामुळे आपण असे भरकटतो.अन्यथा जीवन परिवर्तन करणारा ग्रंथा सारखा दुसरा मित्र कोणीही असू शकतं नाही.याची जाणीव ठेवून आपण आपलं जीवन यशस्वी होण्यासाठी ग्रंथाची मैत्री केली पाहिजे त्याच बरोबर विचारांची आरधान यशस्वी पणे पुर्ण केली पाहिजे.जीवनाच खरं यश आणि फलित साध्य करायचं असेल तर ग्रंथाशी मैत्री करून विचारांची आराधना यशस्वीपणे पूर्ण करता आली पाहिजे हेच जीवन हित आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# लेखक, पत्रकार संदीप काळे यांना राष्ट्रीय साहित्य पुरस्कार जाहीर

## साहित्यिक, शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची दखल

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** कुशल संघटक, सुप्रसिध्द लेखक तथा संपादक संदीप काळे यांच्या मुक्काम पोस्ट आई, ट्वेल्थ फेल, ऑल इज वेल, प्रेम सेतू आदी पुस्तकांनी खपाच्या बाबतीत सर्व विक्रम प्रस्थापित केले आहे. त्यांची उपरोक्त चारही पुस्तके सर्व भाषेत प्रकाशित झाली आहेत असून, अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट झाली आहेत. वर्ल्ड रेकॉर्ड, इंडिया बुक रेकॉर्ड आणि लिमका बुक रेकॉर्डमधे त्यांच्या लिखाणाने रेकॉर्ड केले आहे. त्यांच्या या विक्रमादित्य लिखाणाने साहित्यिक, शैक्षणिक आणि सामाजिक कार्यात मोलाची भर घातली आहे. त्याअनुषंगाने त्यांच्या कार्याची दखल घेत, साहित्य क्षेत्रातील मानाचा समजला जाणारा " रुपाली दुधगावकर " हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. अशी माहिती शिवार चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ श्रीधर भोंबे यांनी एका पत्रकार परिषदेत दिली आहे. नामवंत लेखक, प्रसिद्ध निवेदक, कुशल संघटक आणि एका आघाडीच्या पेपरमध्ये संपादक म्हणून कार्यरत असलेले संदीप काळे यांचा जन्म १५ आगस्ट १९८२ साली नांदेड जिल्ह्यातील पाटनुर गावात एका सुसंस्कृत आणि प्रगतिशील शेतकरी कुटुंबात झाला आहे. त्यांचे वडील श्री रामराव काळे हे शेतीनिष्ठ शेतकरी आहेत.तर आई कमलाबाई उर्फ मुक्ताबाई ह्या सोज्वळ स्वभावाच्या साध्या गृहिणी आहेत. एका सधन शेतकरी कुटुंबात जन्मलेले संदीप काळे यांना लहानपणा पासूनच शिक्षणाची व साहित्य क्षेत्राची आवड होती. " इच्छा तिथे मार्ग " हा ठाम निश्चय त्यांच्या मनाशी असल्यामुळेच त्यांनी साहित्य क्षेत्रात दैदीप्यमान कार्य केले आहे. अनेक वृत्तवाहिन्यांच्या कार्यक्रमात संपादक म्हणून कार्य केलेले संदीप काळे आघाडीच्या पेपरमध्ये संपादक पदावर कार्यरत असतांनाही त्यांनी लिखाणाच्या माध्यमातून रेकॉर्ड केले आहे. तद्वतच पुरस्कारांचा वर्षाव देखील त्यांच्यावर झाला आहे.साहित्य,शासन, सामाजिक संस्था आणि विविध पत्रकार संघातर्फे तब्बल ३८० पुरस्कारांनी काळे यांना सन्मानित करण्यात आले आहे. पत्रकारिता महाविद्यालयात प्राध्यापक पदाची जबाबदारीने सेवा बजावणारे संदीप काळे यांनी तब्बल २६ देशांचा अभ्यास दौरा केला आहे. दैनिक सकाळमधील " भ्रमंती लाईव्ह " या त्यांच्या सदराने लोकप्रियतेचे सर्वोच्च शिखर सर केले आहे. त्यांच्या या रेकॉर्ड ब्रेक कामाची दखल घेऊन, गेल्या २२वर्षापासून दिला जाणारा आणि साहित्य क्षेत्रात प्रतिष्ठित समजला जाणारा " रुपाली दुधगावकर " पुरस्कार त्यांना जाहीर झाला आहे.२१ हजार रुपये रोख आणि सन्मानचिन्ह असे स्वरुप असलेल्या या पुरस्कारासाठी नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीने संदीप काळे यांची निवड केली आहे. या पुरस्काराचे वितरण लवकरच मान्यवरांच्या हस्ते समारंभपूर्वक करण्यात येणार असल्याची माहिती डॉ श्रीधर भोंबे यांनी दिली आहे. सदर पत्रकार परिषदेला उप प्राचार्य प्रा. मुंजाजी दाभाडे,डॉ. विलास पाटील, प्रा. पांडुरंग निळे, गजानन खैरीकर आदींची उपस्थिती होती.



वसंत खडसे
9373578429



**आता पर्यंतचे पुरस्काराचे मानकरी :** कवियत्री अनुराधा पाटील, रंगनाथ पठारे, कवि भुजंग मेश्राम, शाम मनोहर, अरुण काळे, प्राचार्य भगवान देशमुख, जयराम खेडेकर, भ . मा . परसवाळे, संजीवनी तडेगावकर,डॉ . किशोर सानप, श्रीधर अंभोरे, सुचिता खल्लाळ, श्रीकांत देशमुख, विद्याधर म्हैसकर, इंद्रजीत घुले,डॉ . पृथ्वीराज तौर,डॉ . प्रज्ञा दया पवार, मंगेश काळे,डॉ . कविता मुरूमकर,डॉ . मीनाक्षी पाटील, आदी मान्यवर साहित्यिकांना " रुपाली दुधगावकर " राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे .

**संदीप काळे आणि व्हॉईस ऑफ मीडिया :** कारोना महामारीत एका संपादक पदावर कार्यरत असणाऱ्या पत्रकार मित्रावर ओढवलेला बिकट प्रसंग आणि त्याची खालावलेली आर्थिक परिस्थिती संदीप काळे यांनी प्रत्यक्ष पहिली . आणि ही संवेदनशील स्थिती त्यांच्या मनात खोलवर रुजली . याच प्रसंगातून पत्रकारांसाठी काहीतरी करावे ही संकल्पना काळे यांना सुचली . त्यातूनच व्हॉईस ऑफ मीडिया या पत्रकारांच्या संघटनेचा जन्म झाला . संस्थापक आणि राष्ट्रीय अध्यक्ष असलेले संदीप काळे यांच्या व्हॉईस ऑफ मीडिया या संघटनेत आजमितीस संपुर्ण देशात ३७ हजार पत्रकार काम करतात . देशातील सर्वात मोठी पत्रकारांची संघटना असलेली व्हॉईस ऑफ मीडिया तब्बल १९ देशात पोहचली आहे .हीच लेखक,निवेदक,आणि जेष्ठ पत्रकार असलेले संदीप काळे यांच्या कुशल संघटनात्मक नेतृत्वाची सर्वात मोठी पावती आहे .



पुण्यात सध्या चर्चेचा विषय असलेला महाराष्ट्रातील पंचवीस फूट उंच छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ख्यातनाम शिल्पकार जयाद्री कलाभूषण महेंद्र थोपटे यांनी त्यांच्या कला स्टुडिओत पूर्ण केला. सदर पुतळा कोकणातील रोहा या गावी येत्या 19 फेब्रुवारीला स्थापित करण्यात येणार आहे. या वेळी पुतळ्याची पाहणी करताना राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष, खा. सुनील तटकरे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपालीताई चाकणकर, रोहा नगर परिषद मुख्याधिकारी भिसे यांनी केली. या वेळी पुणे धायरीचे नगरसेवक किशोर पोकळे, शिल्पकार महेंद्र थोपटे आणि कला संस्कारचे अनेक कलाकार उपस्थित होते. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# आनंद पवार राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर :** सम्यक, पुणे आयोजित सक्षम ग्रामीण पत्रकार संघ, महाराष्ट्र वार्षिक पत्रकारांच्या कार्यशाळेच आयोजन तांबळडेग, मंकी रिट्रीट जिल्हा-सिंधुदुर्ग येथे करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी छत्रपती संभाजीनगर लातूर, नांदेड, बीड, धाराशिव, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील पत्रकार व पुण्यातील पत्रकारितेचे शिक्षण घेणारे निवडक विद्यार्थी या कार्यशाळेसाठी उपस्थितीत होते. निमित्ताने सक्षम ग्रामीण पत्रकार संघ यांच्या वतीने संम्यक च्या कार्यकारी संचालक पदावर कार्यरत आसलेले आनंद पवार यांना कोकण नाऊचे कार्यकारी संपादक विजय शेट्टी यांच्या हस्ते जिवन गैरव पुरस्कार देण्यात आला.

यावेळेस प्रितम पोतदार भिमराव बडुरकर.डॉ. निवास वरपे, राजेश पाटील, छायाचित्रकार शांताराम मगर,विष्णु आचार्य, सुनिल डोंगरे, युवराज सोनवणे, गैतम लंके, जुलफेकार काझी, सुनिल वाघमारे, शांताराम कुभांर यांची प्रमुख उपस्थितीथी होती. सक्षम ग्रामीण पत्रकार संघ, महाराष्ट्र ही महाराष्ट्रातील ग्रामीण भागात सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या पत्रकारांची संघटना आहे. मे २०१८ मध्ये सम्यक, (पुणे) यांच्या माध्यमातून स्थानिक दैनिकांमध्ये गर्भपात विरोधी भाषा बदलासाठी महाराष्ट्रातील ग्रामीण पत्रकारांचा प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमापासून हे सर्व पत्रकार एकत्रित येऊन सक्षम ग्रामीण पत्रकार संघ स्थापन झाला. संम्यक संसथेचे आनद पवार यांनी स्त्रियांचे विविध प्रश्न, त्यांच्या आरोग्याचे हक्क व स्त्रियांच्या सुरक्षित गर्भपाताच्या अधिकारांबाबत महाराष्ट्रातील स्थानिक वर्तमानपत्रांमधून विस्ताराने लिखाण केले जावे व त्यांतील भाषा ही हक्काधारीत असावी यासाठी 'सम्यक'ने २०१८ ते २०२० या काळात महाराष्ट्रातील ग्रामीण पत्रकारांसाठी दोन अभ्यासक्रम चालविले. हे अभ्यासक्रम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र व मुंबई विद्यापीठाच्या वृत्तपत्र विभागाच्या सहकार्याने राबविले गेले. या अभ्यासक्रमांच्या शेवटी 'सक्षम ग्रामीण पत्रकार संघ, महाराष्ट्र' या संघाची स्थापना करण्यात आली. आत्तापर्यंत या अभ्यासक्रमातील पत्रकारांनी स्त्रियांच्या सुरक्षित गर्भपाताच्या व एकूणच अधिकारांच्या मुद्यावर २८० पेक्षा जास्त बातम्या व लेख ग्रामीण महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध केले आहेत. 'सम्यक' पुणे या संस्थेने आयोजित केलेल्या या मेळाव्यात यावर्षी 'सक्षम ग्रामीण पत्रकार' संघाच्या सदस्यांसोबतच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागाचे निवडक विद्यार्थीदेखील सहभागी होणार होते. या मेळाव्यात लिंगभाव, पितृसत्ता, स्त्रियांचे लैंगिक व प्रजनन आरोग्य आणि हक्क, बदलती पत्रकारिता व स्त्रियांचे प्रश्न, डिजिटल माध्यमे आणि विषयांवर आनंद पवार यांची सामाजिक क्षेत्रात करीत असलेल्या कार्याची दखल घेऊन बाळशास्त्री जांभेकर राज्यस्तरीय " जीवन गौरव पुरस्कार " देऊन सन्मान करण्यात आला. पुरस्काराला उत्तर देताना आनंद पवार म्हणाले स्थानिक दैनिकांमधील गर्भपात विरोधी भाषां बदलासाठी गेली पाच वर्षे अविरत प्रयत्नशील आहेत लिंगभाव, पितृसत्ता, स्त्रियांचे लैंगिक व प्रजनन आरोग्य आणि हक्क, बदलती पत्रकारिता सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य याविषयी आपण दिलेल्या पुरस्कारान जबाबदारी वाढली आसुन आणखी मोठ्या प्रमाणात काम करणार आसल्याचे मत आनंद पवार यांनी व्यक्त केले.




# दैव बलवत्तर म्हणून कारने तीन पलट्या खाऊनही बालंबाल बचावले

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील शेंदुर्णी जवळ असलेले लिहे तांडा येथील सोयगाव येथील शिक्षक आपल्या कारने गाडी नंबर MH-19-C 4462 ने पहूरहून जळगाव कडे जात असताना पहूर,पाळधीच्या मधात डुक्कर आडवे आल्याने कारचा मोठा अपघात झाला कारने तीन पलट्या खाऊन हि कोणत्या प्रकारचे जिवितहानी झाली नाही. काळ आला होता पण वेळ आली नव्हती दि.२५/१२/२३ सोमवार रोजी सकाळी आठ वाजता वेळी जळगाव कडे भरधाव वेगाने जात असताना अचानक मधात डुक्कर आल्याने कारने रस्ताच्या कडेला तीन पलट्या खाल्या व रस्तावर आदळलेली कार दृश्य होते हृदयाचे ठोके चुकवणारे आणि काळजाचा थरकाप उडविणारे पण काही वेळा अचंबित घटना घडतात तशी घटना घडली आणि चक्काचूर झालेल्या गाडीत तीन जण बाल बाल सुदैवाने बचावले. छत्रपती संभाजीनगर ते जळगाव राष्ट्रीय महामार्ग पहूर पाळधी येथील डुक्करामुळे अपघातात झाला कारचा चक्काचूर झाला पण सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही कार मध्ये सवार आलेले तिघेही किरकोळ जखमी झाले असून केवळ दैव बलवत्तर म्हणून बचावले आहेत.अपघात होताच आजूबाजूला असलेलें काही शेतकरी व प्रवासी यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन त्यांना कारच्या बाहेर काढले.ही घटना सोमवारी सकाळी आठ वाजेच्या दरम्यान हा अपघात झाला आहे. घटनास्थळावरून आणि स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार हा अपघात भयानक झाला होता.पहूर च्या पुढे जळगाव रोड वर जबरदस्त अपघात गाडीने तीन चार वेळा पलटी खाल्ली गाडी चालक मालक हे सोयगाव चे शिक्षक आहे आणि लिहे दिगर ग्रामपंचायत सदस्य भाऊल चव्हाण हे पण होते.जळगाव हून गुजरात जात होते अचानक गाडी पुढे डुक्कर आल्याने अपघात झाला कोणाला दुखा पत झालेली नाही सदर माहिती लिहे दिगर येथील ग्राम रोजगार सेवक शाम जाधव यांनी बोलताना दिली.



# राक्षसभुवन वरदसुत दत्तस्थान

आधुनिक केसरी

**मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील राक्षसभुवन या ऐतिहासिक क्षेत्रात अनेक महत्त्वाच्या घटना घडल्या आहेत. निजाम व पेशवे यांच्यांतील लढाई येथेच होऊन साडेतीन शहाण्यांपैकी एक विठ्ठल सुंदर मारला गेला. पौराणिक दृष्टीने हे स्थान महत्त्वाचे आहे. राक्षसभुवन हे दत्तप्रभूंचे आदिपीठ मानले जाते. प्रभु रामचंद्र यांना अत्री ऋषींच्या आश्रमातून याच गावी दत्तात्रयांचे दर्शन झाले होते. 'रक्षोभुवन माहात्म्य' नावाच्या संस्कृत ग्रंथात येथील शनीचे महत्त्व वर्णन केले आहे. येथे गौतम, अगस्ती, अत्री, दधीची इत्यादी ऋषींनी निवास केला होता. येथील आत्मतीर्थावर अत्री ऋषींनी अनुष्ठान केले होते. येथेच ब्रह्मा, विष्णु, महेश हे देव अतिथींच्या रुपाने आले. यांनी अनसूयेच्या सत्त्वहरणाचा प्रयत्न केला.**

अत्री ऋषींच्या आश्रमाजवळ वरद दत्तमंदिर आहे. जवळच दधीची ऋषींचे दादेश्वर नावाचे महादेवाचे मंदिर आहे. येथेच दासोपंतांना दत्तात्रयांची कृपा झाली. त्यांनी राक्षसभुवन येथे बरेच दिवस अनुष्ठान केले. वरददत्तमंदिराची रचना आश्रमासारखी आहे. मंदिरावर शिखर नाही. दत्तस्वामींनी स्थापना केलेल्या दत्तमूर्तीची ख्याती एकमुखी व षड्भुज अशी आहे. दत्तात्रयांचा तिसरा अवतार म्हणजे दत्तस्वामी मानले जातात. 'दत्तलीला गुरुचरित्र' हा ग्रंथ केशव उर्फ बाबास्वामी यांनी लिहिला आहे. दत्तनाथ उज्जैनीकर हे याच मठाच्या परंपरेतील होते. बा. न. मुंडी यांनी दत्तनाथ उज्जैनीकर (ढोली बुवा) यांचे' साहित्य व चरित्र लिहिले आहे. एकनाथ महाराजांपासून येथे आजपर्यंत नाथषष्ठी व दत्तजयंती हे उत्सव सुरू आहेत.

**श्री_क्षेत्र_राक्षसभुवन_दत्तात्रेयांचे #आद्यपीठ_वरद_दत्त_संस्थान :** राक्षसभुवन महाराष्ट्राच्या बीड जिल्ह्यात गोदावरीकाठी गेवराई तालुक्यात वसलेले गाव आहे. येथील #शनिमंदिर महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहे. या तीर्थक्षेत्री शनिदेवाचे प्रथम पीठ प्रसिद्ध आहेच, १७६३ मध्ये येथे झालेल्या लढाईत थोरल्या माधवराव पेशव्यांनी निजामाचा दारुण पराभव केला ही लढाई राक्षसभुवनची लढाई म्हणून इतिहासाच्या पानांवर कोरली गेली आहे. राक्षसभुवनची लढाई ऑगस्ट १०, इ. स. १७६३ रोजी राक्षसभुवन येथे मराठे व हैदराबादचा निझाम यांच्यात झाली. यात निझामाचा सडकून पराभव झाला. गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन हे गाव शनीबरोबरच दत्त प्रभूंच्या जन्म स्थानामुळे प्रसिद्ध असून याठिकाणी सहा दिवस पारंपरिक पद्धतीने दत्त जन्म सोहळा शेकडो वर्षांपासून साजरा होत आहे. दत्त संस्थानामुळेही ते तितकेच प्रसिद्ध आहे. आत्मानुभूती प्राप्त करून देणारे आत्मतीर्थ, अगस्तीतीर्थ, नृसिंहतीर्थ, भारतातील प्रख्यात २१ गणपतींपैकी एक विज्ञान गणेशतीर्थ, सोमेश्वरतीर्थ, कालिकातीर्थ अशी आठ तीर्थेदेखील प्रसिद्ध आहेत. अशा या पवित्र क्षेत्री गोदावरी तीरावर अतिशय प्राचीन असे 'दत्तस्थान' आहे. या स्थानी प्राचीन काळी #दंडकारण्य होते, असा उल्लेख पुराणात आढळतो. दत्त प्रभूंना दत्त अत्रे, असे नाव याठिकाणी प्राप्त झालेले आहे. अत्री अनुसया यांचा आश्रम याठिकाणी असल्याचा उल्लेख पुराणात आढळतो. या स्थानावर त्यांना #पुत्रसुख अनुभवता आले, असे भाविक सांगतात. पूर्वी हा दंडाकारण्याचा भाग असल्यामुळे अत्री, अगस्ती, दधीची, पिपल्लाद, दक्षप्रजापती महर्षी गौतम आदी मान्यवर ऋषी याठिकाणी वास्तव्यास होते. याचस्थानी वनवासात असतांना #प्रभू_रामचंद्रांनी सीतामातेसह #दत्त_दर्शन झाल्याचा उल्लेख रामविजय ग्रंथात आढळतो. संपूर्ण वनवासात प्रभू रामचंद्र एकाच स्थानावर दोन वेळा येऊन गेले असे एकच ठिकाण येथे आहे. सती हरणापुर्वी व सिता हरणानंतर शनी देवता स्थापनेवेळी अन्य कोणत्याही स्थानावर प्रभू रामचंद्र दोन वेळा गेलेले नाहीत. ज्या दत्त मूर्तीचे व अवतरणाचे वर्णन सुंदरतेने करण्यात आलेले आहे. याक्षेत्रावर #दत्तभक्त_वासुदेवानंद_सरस्वती ( #टेंभे स्वामी) यांनी गोदावरी दक्षिणेच्या तीर्थाटनावेळी वास्तव्य केल्याचे आढळते. अशा या प्राचिन दत्त संस्थानाची माहिती कमी दत्त भक्तांना आहे. या स्थानावर शिखर नसलेले आश्रमाप्रमाणे रचना असलेले #एकमुखी_षडभूज_दत्ताची_मूर्ती खोल गाभाऱ्यात आहे. कारण माता अनुसयेस सत्त्वहरणेच्या वेळी आपली ओळख पटू नये म्हणून भगवान शिव आपल्या वाहनाशिवाय येथे आले त्याची खूण म्हणून येथील महादेव मंदिरासमोर नंदी नाही. या संस्थानाचा दत्त जयंती उत्सव सहा दिवसांचा असतो. प्रतीवर्षी मार्गशिर्ष शुद्ध १४ रोजी सायंकाळी सूर्यास्तापूर्वी संपन्न होतो. दुसऱ्या दिवशी भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येते. छबीना, पाच सोंग, तीर्थप्रसाद हे कार्यक्रम होतात. महापुरुषांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने गावात भिक्षाही मागितली जाते. भिक्षान्न गृहण केले जाते. याच स्थानावर दत्तभक्त दासोपंतांना #प्रत्यक्ष_दत्तदर्शन झाले. त्यांना स्वतःच्या चरण पादुका दत्तमहाराजांनी दिल्या तेच हे पवित्र स्थान असल्याचा उल्लेख आहे. येथील मंदिरातील वरद दत्तमूर्ती एकमुखी असून, अतिशय दुर्मिळ आहे. ही मूर्ती वालुकामय, षड्भुजा आहे. मूर्ती अत्यंत खोल गाभाऱ्यात असून हे भारतातील असे एकमेव स्थान आहे, ज्या ठिकाणी 'दत्त यंत्र' आहे. बीडच्या राष्ट्रीय महामार्ग २११ पासून हे स्थान फक्त ११ किलोमीटर अंतरावर आहे.

**श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथील वरद_दत्तात्रेय_मंदिर! आद्य_दत्तपीठः**


'सती अनसूयेच्या सतित्वाची परीक्षा पहाण्यासाठी ब्रह्मा, विष्णु आणि महेश भूतलावर आले अन् तिच्या तपोबळामुळे त्यांचे अवतरण तीन छोट्या बालकांत झाले. त्यामधे श्रीविष्णूचे अवतरण ज्या बालकात झाले, ते म्हणजे #श्रीगुरु_दत्तात्रेय!

ही घटना ज्या ठिकाणी घडली, ते ठिकाण आहे श्रीक्षेत्र_रक्षोभुवन! महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात गोदावरी नदीच्या दक्षिण तिरावर वसलेले एक पवित्र दत्तपीठ! कालांतराने या तीर्थक्षेत्राचे नाव '#श्री_राक्षसभुवन' असे झाले.

**श्री_राक्षसभुवन येथील स्थानाला '#आद्य_दत्तपीठ''असे का म्हणतात ?**

श्री दत्तगुरूंची अन्य पिठे, उदा. कारंजा, माणगाव, नृसिंहवाडी इत्यादी ठिकाणे म्हणजे मानवी देहावतारी दत्तपिठे आहेत. ही पिठे श्री दत्तात्रेयाच्या त्या त्या अवताराच्या नावाने प्रसिद्ध आहेत; मात्र राक्षसभुवन येथे प्रत्यक्ष दत्त जन्माला आले. त्यामुळे ते #तत्त्वरूपी_दत्तपीठ आहे. त्यामुळेच या स्थानाला '#आद्य_दत्तपीठ' असेही म्हणतात. येथे ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांनी माता अनसूयेला वर दिला असल्याने हे '#वरद_दत्तात्रेय_मंदिर' म्हणून प्रसिद्ध आहे. हे निर्गुण पीठ असल्याने या मंदिराला कळस नाही.

**दत्तमंदिरातील_दत्तप्रभूंची #विलोभनीय_एकमुखी_मूर्ती** "दत्त मंदिराच्या गाभाऱ्यात गेल्यानंतर समोर दिसते, ती वालुकाश्मापासून बनवलेली आणि पूर्वाभिमुख असलेली सुंदर एकमुखी दत्तमूर्ती! मूर्तीवर नागाचा फणा आहे. या मूर्तीचे उजवे पाऊल पुढे उचललेले आहे. दत्ताच्या वरच्या दोन हातांत शंख आणि चक्र, मधल्या दोन हातांत डमरू अन् त्रिशूळ, तसेच खालच्या दोन हातांत दीपमाला आणि कमंडलू आहे. अशी ही दत्तप्रभूंची विलोभनीय एकमुखी मूर्ती आहे. **दत्तयंत्र :** दत्त मंदिराच्या वरच दत्तयंत्र आहे. यंत्र हे निर्गुणाशी संबंधित असते. या दत्तयंत्राच्या साहाय्याने वातावरणातील निर्गुण दत्ततत्त्व या ठिकाणी आकर्षिले जाते. हे अतिशय दुर्मिळ असे दत्तयंत्र आहे. या यंत्राची रचना तीन भागांत केली आहे. वरच्या भागात 'दत्तयंत्र' असे लिहिले आहे. मधल्या भागात 'श्री गुरवे नमः।' लिहिले आहे आणि शेवटच्या भागावर 'श्री वरद दत्तात्रेय' असे लिहिले आहे. हे यंत्र दगडी आहे. या यंत्राची रचना अष्टकमलदलाकृती आहे. मधे तारका आहेत. दत्तमूर्तीच्या शिरोभागावर यंत्र असलेली अशी रचना अन्यत्र कुठेही बघायला मिळत नाही. संपूर्ण भारतात दत्त मंदिराच्या वरच्या बाजूला दत्तयंत्र असलेले, असे हे एकमेव स्थान आहे.



**सर्व_आयुधांसह_असलेली अन्नपूर्णामातेची_मूर्ती** ज्या ठिकाणी दत्तकार्य असते, त्या ठिकाणी अन्नपूर्णामाता असतेच. त्यामुळे या ठिकाणी अन्नपूर्णा #सगुण रूपात वास्तव्यास आहे. अन्य ठिकाणी अन्नपूर्णेची मूर्ती हातात पळी असलेली असते; पण येथे ती सगुण रूपात आल्याने ती सर्व आयुधांसह आहे. **मंदिरात_होणारी_अन्नपूर्णामातेची_आराधना** प्रत्येक मासाच्या (महिन्याच्या) पौर्णिमेला महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती, असा उल्लेख करून तिला पुरणा-वरणाचा नैवेद्य दाखवला जातो. तिचा जोगवा मागितला जातो आणि तिची आराधना केली जाते. आजही साधक किंवा स्त्रिया यांना सेवेनंतर अन्नपूर्णेचे सगुण रूपात दर्शन झाल्याची अनुभूती प्राप्त करता येते.



**दत्त_महाराजांची फेरी निघाल्यावर साधक आणि भाविक यांना येणाऱ्या अनुभूती** "आजही दत्त महाराजांचा आशीर्वाद आणि अन्नपूर्णामातेचा वावर आपल्याला जाणवतो. ज्या वेळी दत्त महाराजांची फेरी निघते, तेव्हा चमेली आणि गुलाब या फुलांचा सुवास सगळीकडे दरवळतो. कधी कधी साधक किंवा भाविक यांना स्नान-संध्या करतांना पळी-भांड्याचा जो मंजुळ ध्वनी निर्माण होतो, तो ऐकू येतो. असे हे जाज्वल आणि जागृत ठिकाण आहे.

**श्री. नितीन उपाख्य योगीराज महाराज डोळे यांच्या कुळातील दत्तभक्तांची_माहिती**

दत्तमूर्तीच्या चरणांपाशी मूळ पुरुष, म्हणजे सद्गुरु भाऊ महाराज उपाख्य दत्तास्वामी डोळे यांची समाधी आहे. प.पू. भाऊस्वामी हे अयोनी संभवातून जन्माला आले होते. त्यामुळे गऊबाई आणि गोपालस्वामी हे त्यांचे ऐहिक युगातील माता आणि पिता होते. ते अजानुबाहू होते. त्यांच्या कानांच्या पाळ्या खांद्यापर्यंत होत्या. भाऊसाहेब महाराज, अंतोबादादा, दत्तास्वामी, अवधूतबुवा, केशवबुवा, ऋषीकेशस्वामी इत्यादी सात पिढ्यांपर्यंत अजानबाहू परंपरा कायम होती. आठव्या, नवव्या आणि दहाव्या पिढीत त्यात पालट झाला. परंपरागत गादीवर एक पुत्र आणि दोन कन्या अशी परंपरा होती. एकच पुत्र असल्याने म्हणजे शके १६०० पासून भाऊ महाराजांपासून ते आजपर्यंतच्या गुरूंपर्यंत परंपरा अखंड होती. त्या काळात अपत्यसंख्या अधिक असायची. तेव्हाही एकच पुत्र असे. सध्याच्या पिढीत दोन भाऊ आहेत आणि आता वंशवृक्ष विस्तारेल. पिठावरील महाराजांद्वारे अन्नदान, गुरुमंत्र, शिष्य संप्रदाय, कुलधर्म अशा प्रकारे साधना केली जाते. त्यामुळे या स्थानाचे पावित्र्य वाढत गेले आहे. दत्त मंदिराच्या डाव्या बाजूला, म्हणजे आपल्या उजव्या बाजूला डोळे कुळातील दुसऱ्या पिढीतील दत्तभक्त, म्हणजे प.पू. भाऊस्वामी यांचे चिरंजीव प.पू. बाबास्वामी, उपाख्य केशवस्वामी यांची समाधी आहे. त्या समाधीच्या वरच्या बाजूला एक शिवलिंग आहे. या समाधी मंदिरावर शीलालेख कोरलेला दिसतो. याच



मंदिराच्या डाव्या बाजूला एक घुमटी दिसते. या घुमटीतून प.पू. बाबास्वामी यांच्या समाधीकडे जाण्याचा भुयारी मार्ग आहे.

दत्तपिठातील भगव्या रंगातील पाच समाध्या डोळे कुळातील दत्तभक्तांच्या आहेत. भगवा रंग वैराग्याचे दर्शक आहे. प.पू. भाऊस्वामी आणि प.पू. बाबास्वामी यांच्यासह एकूण सात समाध्या या ठिकाणी आहेत. नंतरच्या तीन पिढ्यांना आदेश नसल्याने त्यांच्या समाध्या येथे नाहीत. सध्या नितीन उपाख्य योगिराज महाराज डोळे हे प.पू. भाऊस्वामींचे अकरावे वंशज आहेत. **भारतातील_नंदी_नसलेले एकमेव_शिवमंदिर !** प.पू. बाबास्वामी डोळे यांच्या समाधी मंदिराकडे नेणाऱ्या घुमटीच्या बाजूला सोमेश्वर महादेवाचे मंदिर आहे. अत्रिऋषींची पत्नी अनसूया सती जाण्याच्या वेळी भगवान शिव नंदीविना या ठिकाणी आले होते. त्यामुळे हे मंदिर भारतातील नंदी नसलेले एकमेव शिवमंदिर आहे.

**दत्तभक्त श्री. नितीन उपाख्य योगीराज महाराज डोळे यांचे #आध्यात्मिक_कार्य**

सद्गुरूंच्या आज्ञेने वैद्यकीय व्यवसाय बंद करून आध्यात्मिक क्षेत्रात कार्य करण्यास सूरूवात झाली. #पिता_आणि_सद्गुरु एकच ! त्यांनी वर्ष २००८ मध्ये नितीन डोळे यांना आज्ञा केली, ''अजून किती काळ वैद्यकीय सेवा करणार ?'' मी १६ वर्षे वैद्यकीय सेवा केली. 'कोणताही पिता आपल्या पुत्राला व्यवसाय बंद कर', असे सांगणार नाही; पण 'ही आज्ञा त्यांच्या पित्याची नसून गुरूंची आज्ञा आहे', हे नितीन महाराज डोळे यांच्या लक्षात आले. मग त्यांनीं व्यवसाय हळूहळू न्यून केला. त्यांनी आध्यात्मिक क्षेत्रात काम चालू केले. संस्थानाचे काम वाढवले. एक वर्षात नितीनजींचे पिता कालवश झाले. मग त्यांच्या लक्षात आले, 'एक वर्षापूर्वी वडिलांनी त्यांना या क्षेत्रात येण्यासाठी का सूचना केली होती ?' **आद्यपिठाचे महत्त्व_जाणण्यासाठी_नितीनजीडोळे यांचा अभ्यास**

वर्ष २००९ पासून संस्थानचे पूर्ण दायित्व नितीनजी डोळे यांच्यावर आले. त्या वेळी त्यांनी वैद्यकीय व्यवसाय न्यून केला होता. ते विज्ञानाचे विद्यार्थी असल्याने त्यांची जिज्ञासा अधिक होती. नितीनजींनी ठरवले, 'दत्ताचे जे आद्यपीठ आहे, ते केवळ वाडवडील म्हणतात; म्हणून नव्हे, तर आद्यपीठ_म्हणजे_काय ?' , हे आपण शोधून काढू.' त्यासाठी त्यांनी वाचन, लेखन आणि अभ्यास चालू केला. महान_विभूतींमुळे एखाद्या स्थानाला #महत्त्व प्राप्त होते', हे नितीनजी डोळे यांच्या लक्षात आलेः नितीनजी संपूर्ण भारतभर प्रवास करत करत नेपाळपासून कन्याकुमारीपर्यंत सर्व दत्तस्थानांना भेट देऊ लागले. ते कारंजा, गाणगापूर, पिठापूर, नरसोबाची वाडी आणि माहूर या ठिकाणी गेले.त्यांनी जमेल तेवढी साधना केली. अक्कलकोटला स्वामी समर्थ, शेगावला गजानन महाराज, नरसोबाच्या वाडीला नृसिंह सरस्वती आणि कुरवपूरला श्रीपाद श्रीवल्लभ यांच्यामुळे महत्त्व प्राप्त झाले. अर्वाचीन काळात प. प. टेंब्येस्वामी यांनी कारंजा, कुरवपूर आणि पिठापूर या स्थानांचा शोध लावला आणि प्रचार, प्रसार केला. त्यापूर्वी 'पिठापूर हे श्रीपाद श्रीवल्लभांचे जन्मस्थान आहे', हे कुणालाही ठाऊक नव्हते. प. प. टेंब्येस्वामींनी त्याचा प्रचार केला; म्हणून आज ते 'दत्तस्थान' म्हणून उदयास आले. दत्तास्वामी यांनी राक्षसभुवन क्षेत्रातील दत्तस्थानाचा शोध लावणे, तेथे साधना करून दत्तजन्माचा उत्सव चालू करणे आणि तो आजही अव्याहत चालू असणे त्याही पूर्वी शके १६०० मध्ये नरसिंह सरस्वतींच्या ३०० वर्ष आधी नितीनजी डोळे यांचे मूळपुरुष दत्तास्वामी यांनी राक्षसभुवन क्षेत्रातील दत्तस्थानाचा शोध लावला आणि त्या ठिकाणी येऊन स्वतः साधना केली. त्यांनी दत्तजन्माचा उत्सव चालू केला आणि तो आजही अव्याहत चालू आहे. हे सर्व दत्तप्रभूंची इच्छा असल्याने होत आहे.

**श्रीक्षेत्र_राक्षसभुवन येथील #श्री_पांचाळेश्वर**



**मंदिराचा इतिहास आणि माहात्म्यः-**

'महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथे गोदावरीच्या पात्रात श्री पांचाळेश्वर मंदिर आहे. श्री नृसिंह सरस्वती यांनी गुरुचरित्रात या स्थळाचा उल्लेख केलेला आहे. 'येथे श्री दत्तगुरु प्रतिदिन दुपारच्या भोजनासाठी सूक्ष्मातून येतात', असे या क्षेत्राचे माहात्म्य आहे. या ठिकाणी चक्रधर स्वामींनी काही काळ तपश्चर्या केल्याने हे महानुभव पंथाचे पूजनीय स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे.

सगुण रूपातील श्री अन्नपूर्णामातामंदिरातील एकमुखी श्री दत्तमूर्ती श्री दत्त पादुकानिर्गुण दत्ततत्त्व आकृष्ट करणारे दुर्मिळ दत्तयंत्र

तुम्हासहित औदुंबर । आमुच्या पादुका मनोहर । पूजा करिती जे तत्पर । मनकामना पुरती जाणा ॥

प्रसन्नता देणाऱ्या आनंदस्वरूप अशा दत्तगुरूंचे दर्शन घ्या ! **पांचाळेश्वर_हे_दत्तात्रेयांच्या भोजनाचे_स्थान** हे दत्तात्रेयाचे भोजनस्थान आहे. दत्तात्रेय काशीला स्नान करतात, कोल्हापूरला भिक्षा मागतात आणि पांचाळेश्वराला भोजन करतात. पांचाळ_राजाच्या नावावरून या गावाला #श्रीक्षेत्र_पांचाळेश्वर' असे नाव पडणे पांचाळराजा आणि आत्मऋषी यांच्या विनंतीवरून येथे दत्तात्रेय प्रतिदिन दुपारी १२ वाजता भोजनाला येतात. दत्तात्रेयांनी पांचाळराजा आणि आत्मऋषी यांना वरदान दिले आहे, 'जोपर्यंत चंद्र आणि सूर्य आहेत, तोपर्यंत या ठिकाणी येऊन मी भोजन करीन.' पांचाळ राजाच्या नावावरून या गावाला श्रीक्षेत्र पांचाळेश्वर असे नाव पडले. आत्मऋषींच्या नावाने या स्थानाला 'आत्मतीर्थ' असे संबोधले जाते. **दत्तात्रेय, गोविंदप्रभु आणि चक्रधरस्वामी यांनी या ठिकाणी क्रीडा_करणे** गोविंदप्रभु महाराज पंचलिंगीहून संन्यास घेऊन या ठिकाणी आले. त्याचप्रमाणे चक्रधरस्वामींनी याच ठिकाणी दत्तात्रेयांची भेट घेतली. दत्तात्रेय, गोविंदप्रभु आणि चक्रधरस्वामी यांनी या ठिकाणी क्रीडा केली. **आध्यात्मिक_महत्त्व :-** दत्तात्रेयांच्या कृपेने भूतबाधा, करणी आणि मानसिक व्याधी यांनी त्रस्त असलेल्या व्यक्तीने या ठिकाणी येऊन एकनिष्ठेने सेवा केल्यास ती व्यक्ती १ मासात (महिन्यात) ठीक होते. येथे लांबून येऊन लोक सेवा करतात आणि तृप्त होतात.

**साजरे_होत_असलेले_उत्सव**

चैत्र कृष्ण पक्ष सप्तमीला येथे यात्रा भरते, तसेच छबीना आणि पालखी निघते. येथे धार्मिक कार्यक्रम होतात. येथे दत्तजयंती, श्रीकृष्ण जयंती आणि सर्वज्ञ चक्रधरप्रभु जयंती असे उत्सव साजरे केले जातात. दत्तजयंतीला ७ दिवस आधी सप्ताह असतो. चतुर्दशीला दत्तात्रेयांचा जन्म होतो. पौर्णिमेला यात्रा उत्सव होतो आणि सप्ताहाची समाप्ती होते. 'दत्त महाराजांच्या कृपेने अनेक मानसिक रुग्ण बरे होतात', असा अनेक भाविकांचा अनुभव आहे.

**दत्तगुरूंचे_वामकुक्षी घेण्याचे ठिकाण :-**

श्री पांचाळेश्वर मंदिराच्या उजवीकडे, म्हणजे आपल्या डाव्या बाजूला श्री दत्तगुरूंचे वामकुक्षी घेण्याचे, म्हणजे दुपारच्या भोजनानंतर डाव्या अंगावर पहुडून विश्रांती घेण्याचे स्थळ आहे. येथे सुंदर मंदिर बांधलेले आहे. मंदिराच्या अवतीभोवती डौलदार वृक्ष आहेत. सभोवताली भक्कम तटबंदी आहे. मंदिराच्या समोर भव्य प्रवेशद्वार आहे. त्यावर नगारखाना बांधलेला आहे. महाराष्ट्रात, मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन हे शनीदेवांचे भारतातील साडेतीन पीठापैकी एक पुर्ण पीठ आहे. त्या जवळच पांचाळेश्वर हे दत्त स्थान आहे. औरंगाबाद-बीड-सोलापूर या राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ वर औरंगाबाद पासून१०० कि. मी.अंतरावर राक्षसभुवन फाट्यापासून काही अंतरावर हे क्षेत्र आहे. येथे दत्तजयंती उत्सव ६ दिवस फार मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.

योगिराज डोळे
राक्षसभुवनकर
संपर्क 9420224999



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

# कुणी ताण देता का ताण ?

आधुनिक केसरी

**नटसम्राट नाटकात घर देता का घर असे स्वगत आहे.त्या तालावर आजच्या पिढी साठी ताण देता का ताण असे स्वगत असेल! कारण अवती भवती आज प्रत्येक जण तणावात दिसतो. काही ताण नैसर्गिक, काही दैविक तर काही निमंत्रित! अशी वास्तविक परिस्थिती असते.अनेक गोष्टी आपल्या हातात नसतात. नियंत्रणात नसतात. पण वास्तव हे की अनेकांना ताण ओढवून घ्यायची सवय असते. म्हणजे विनाकारण काळजी करण्याची हौस असते. हे जरा विचित्र वाटेल. पण ते खरे आहे. ताण कुठे नसतात? कुटुंबात असतात. नवरा बायकोच्या संसारात असतात. मग मुलं झाली की त्याच्या भविष्याची, करियरची चिंता! खरे तर तुम्ही चिंता केल्याने परिस्थिती बदलत नाही. त्यात सुधारणा होत नाही.**

पण हे माहिती असूनही आपण मनाला घोर लावून काळजी करीत बसतो.मोठे झाल्यावर कामाच्या ठिकाणचे ताण वेगळे.त्याला वर्क प्रेशर असे गोंडस नाव आहे.आजकाल प्रत्येकाला दिलेले टार्गेट ठरल्या वेळात पूर्ण करायचे असते.कामाच्या ठिकाणी वैयक्तिक जबाबदारी तर असतेच.शिवाय सामूहिक जबाबदारी देखील असते.तिथे सगळे एकमेकावर अवलंबून असतात.आपण जे करू त्यावर दुसऱ्याचे काम अवलंबून असते.आपण देखील कुणावर तरी अवलंबून असतो.टीम स्पिरीट नावाचा प्रकार असतो.त्यात एकाची चूक,एकाचा निष्काळजीपणा दुसऱ्याला भोवती.त्यातून संघर्ष निर्माण होतात.तिथे बॉस असतो.ज्येष्ठ कनिष्ठ अशा पातळ्या असतात. त्यातले ताण तणाव वेगळेच..लिंग भेद, जाती भेद आहेतच.एकमेकांना समजून घेणे,सांभाळून घेणे फार कमी.. द्वेष,तिरस्कार,स्पर्धा,स्वार्थ याचेच प्रमाण जास्त.समजूतदारपणा नसेल तर त्रास होणारच. ताण वाढणारच.

लहान मुले,वयात येणारी,आलेली मुले यांच्या पालकांसाठी च्या समस्या आजकाल वेगळ्याच.. एकतर अवती भवतीच्या स्पर्धेचे प्रेशर..सोशल मीडिया, नवे तंत्रज्ञान,इथून आलेला नको त्या माहितीचा महापूर,हे सगळे आहेच.ते टाळता येणे अशक्य..आपण किती कुठे लक्ष ठेवणार मुलावर? चोवीस तास पहारा लावून बसणार थोडीच? शिवाय नव्या पिढीला मोठ्यांच्या शिस्तीचा जाच नको आहे. आई वडिलांचे सारखे बोलणे,रागावणे, म्हणजे त्यांना कटकट वाटते आहे.त्यांना त्याचे स्वातंत्र्य हवे आहे.मोकळे रान हवे आहे.आम्ही आमचे निर्णय घ्यायला समर्थ आहोत,ही त्यांची भूमिका आहे.त्यांना सकाळ संध्याकाळ उपदेशाचे डोस नको आहेत पालका कडून.त्यांना त्यांचे निर्णय घ्यायचे आहेत. त्यांना तेव्हढी अक्कल आहे अशी त्यांची धारणा आहे.त्याच्यावर घरच्या पेक्षा बाहेरचा प्रभाव जास्त आहे.

आता घरात बहुतेक नवरा बायको दोघेही कमावते आहेत.आधी कामाची निश्चित विभागणी होती.घरचे अन् बाहेरचे दोन्ही सांभाळायचे म्हणजे गृहिणी वर ताण पडणारच..अनेक पुरुष आता घरात हातभार लावत आहेत.शेअरिंग केरिंग मिळून करताहेत.पण कुठे न कुठे मतभेद होतातच.ठिणगी पडते.भडका उडतो.संघर्ष वाढतो.प्रत्येकाचा इगो आड येतो. इथेही तडजोडीची तयारी नाही.मेरे मुर्गिकी एकही टांग अशी हेकेखोर वृत्ती आहे.घरी मुलाचे आई वडील एकत्र राहत असतील तर मग विचारायलाच नको. वृद्ध मंडळींना सांभाळणे हे कर्तव्य न राहता ते एक नकोसे ओझे झाले आहे.ज्याची मुलं कामा निमित्त परदेशी गेली,तिकडेच स्थिरावली त्याच्या समस्या,त्याचे ताण तणाव वेगळेच.तुम्ही तिकडे गेला तरी टेन्शन,ते इकडे आले तरी टेन्शन.नात्यात नैसर्गिक मोकळेपणा राहिला नाही हे कटू सत्य. राहिलाय तो नाटकी उपचार.कसेतरी निभावून नेण्याचा कोरडा उपचार! मुलीवर तिच्या माहेरचा प्रभाव.मुलावर घरच्या थोरा मोठ्यांचे दडपण.शिवाय नोकरीच्या कामाच्या जागचे टेन्शन,तिथल्या डेड लाईन चे,टार्गेट पूर्ण करण्याचे टेन्शन वेगळेच.. वेगवेगळ्या फ्रंट वर लढावे लागते प्रत्येकाला. जो तो वेग वेगळ्या दिशांनी ओढल्या जाणाऱ्या दोरानी बंदिस्त..त्यातून सुटण्याची केविलवाणी धडपड! अशी एकूण परिस्थिती.. आपण शरीराला काही झाले तर पटकन डॉक्टर कडे जातो. ट्रीटमेंट घेतो. पण मनाचे ताण तणाव आतल्या आत सहन करतो. त्यासाठी उपचार,समुपदेशन घेण्याची आपल्याला गरजच वाटत नाही.मग हे



मनाचे आजार कळत नकळत वाढतच जातात. अशी वेळ येते की सारे सहन शक्तीच्या पलीकडे जाते. एकतर समस्या आहे हेच आपल्याला मान्य नसते.कबूल करायची तयारी नसते.मग समस्या सोडविणे राहिले दूर!पालक पाल्य,नवरा बायको याच्या समस्या सोडविण्यासाठी तज्ञ आहेत. मानस शास्त्रज्ञ आहेत.पण अशा एक्स्पर्ट ची मदत घेण्याची गरजच वाटत नाही कुणाला.एक तर मीच बरोबर हा अहंकार.तडजोड करायची तर ती दुसऱ्याने हा हट्ट. सारखे तू तू मैं मैं चाललेले..यात घरी वाढती मुलं असतील तर त्याच्या समोरच भांडणे,एकमेकावर ओरडणे..कसले संस्कार कसले काय.ना पोटच्या पोरांची चिंता ना नातेवाईक, समाज याची काळजी. फक्त स्वार्थी, आत्म केंद्रित विचार. समस्या सोडविण्यात रस नाही.जखम चिघळत ठेवण्यात आनंद! शिवाय वर दुःखाचे प्रदर्शन..आपल्यावरच केवढे आकाश कोसळले याचा धींडोरा पिटण्यात आनंद! फुकटची सहानुभूती मिळविण्याची केविलवाणी धडपड! नवरा बायको चे हे संघर्ष थेट घटस्फोटापर्यंत विकोपाला जातात.कुणीही तडजोड करायला,समजून घ्यायला तयार नाही.आई वडील एक तर आगीत तेल घालणार किंवा हात झटकून स्वस्थ बसणार! समाजाला देखील कसले काही देणे घेणे नाही.सगळे आपापल्या छोट्याशा त्रिज्येच्या वर्तुळात व्यस्त,मस्त!

ताण फक्त घरातच नाहीत. समाजात आहेत.जाती वर्गाचे संघर्ष,राजकारणी पक्षातले संघर्ष कळसाला पोहोचले आहेत.सर्व सोयी सवलती मला ,माझ्या कुटुंबाला,माझ्या जातीला हव्या आहेत.बाकी वर्गाची, वंचीताची चिंता नाही.मला मिळाले की झाले..त्यासाठी कुठल्याही स्तराला जायची तयारी. समाजातील वर्गा पुरते मर्यादित नाही राहिले भांडण.. राज्य,देश,यातला सत्ता संघर्ष टोकाला पोहोचलाय. भीषण युद्धा पर्यंत..इथे माणुसकीला काळीमा फासणारी कृत्ये ,काळजाचा थरकाप उडविणाऱ्या घटना रोज कानावर येतात.हे संघर्ष आजचे नाहीत. वर्षानुवर्षे हेच चालले आहे.ते थांबावे,माणसाने माणसाशी माणसा सारखे वागावे हे साधे शहाणपण कुणालाच कसे सुचत नाही? मान्य होत नाही? याचे आश्चर्य वाटते.पहिले पाऊल कुणी मागे घ्यायचे यातच जो तो फसलेला! माघार म्हणजे अपयश, दुबळेपणा अशी समजूत झालीय.इथेही आडवा येतो ज्याचा त्याचा अहंकार!इथेही ताण वाढविण्यातच रस..ताण कमी करण्यासाठी पुढाकार कुणीच घेताना दिसत नाही.

अशा वेळी प्रश्न पडतो.आपले वेद, पुराण,आपली संस्कार संपदा कुठे लुप्त झाली? आपल्याकडे बुवा,महाराज,स्वामी,संत महंत यांची कधीच कमी नव्हती..अजूनही नाही.मौलिक ग्रंथ संपदा आहे. गीता,महाभारत,रामायण,वेळ,उपनिषद् सारे सारे आहे..पण ते वाचायला,बघायला,अभ्यासायला कुणाला वेळ नाही.ढोंगी मंडळींचा बाजार मात्र वाढला आहे.चांगले उपाय असले तरी अमलात आणायचे नाहीत.आम्हाला ताण प्रिय आहेत. आम्हाला आपले दुःख गोंजारण्यातच रस आहे. आजारग्रस्त म्हणूनच जगायचे आहे.म्हणूनच कदाचित जो तो ओरडतो आहे."कुणी ताण देता का ताण?"



किरणकुमार आवारे
संपर्क क्र. 9423086021

# जीडीपीमध्ये कृषी क्षेत्राचा वाटा घसरला

आधुनिक केसरी

**भारतीय जीडीपीमध्ये कृषी क्षेत्राचा हिस्सा हा १९९०-९१ मध्ये ३५ टक्के वरून मागील आर्थिक वर्षात १५ टक्क्यापर्यंत घसरला आहे हि घसरण कृषी GVA मध्ये झालेल्या घसरणीमुळे नाही तर औद्योगिक आणि सेवा क्षेत्रात झालेली जलद वाढ यामुळे दिसून येते. अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राचा वाटा घसरला असला तरी हि घसरण कृषी क्षेत्रात झालेल्या घसरणीमुळे झालेली नाही तर, भारतातील औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीमुळे आणि विस्तारामुळे झालेली आहे. जागतिक स्तरावर देखील, जगाच्या जीडीपीमध्ये कृषी क्षेत्राचा वाटा ४ टक्के इतका झाला आहे. तरीही याला काही अंशी का होईना केंद्र सरकारचे आयात निर्यात धोरण जबाबदार आहेच.**

**(मागील अंकावरून)** मागील काळात भाव कमी असल्यावर तुकडा तांदळाचा ही वापर केला जात होता. मका आणि सोयाबीनचे भाव कमी करण्यासाठी पोल्ट्री विभागांना मका आणि सोयाबीनच्या आयातीवरील कर कमी करण्याची मागणी केली जात आहे. कर कमी केल्यास मका आणि सोयाबीनची आवक घटू शकतात. पण सोयाबीन चे भाव खुल्या बाजारपेठेत ५००० पेक्षा कमी असलेने सरकार कर कमी असेल वाटत नाही.

तुरीची खपत १५% ने घटली असून यावर्षी तुरीचे सरासरी भाव १७० ते २०० रुपये प्रति किलो दरम्यान रिटेल बाजारात टिकून राहिले. जे मागील वर्षी सरासरी १२० ते १४०रुपये प्रतिकिलो दरम्यान टिकून राहत होते. अधिक भावामुळे बहुतांश लोकांनी तुरडाळीऐवजी चणा डाळीचे उपयोग वाढाविले, परिणामी या हंगामात तुरीची खपत जवळपास १५% ने घटली. आयात वाढल्यामुळे भाव सध्या नियंत्रणात येत आहेत. देशात ४२ ते ४५ लाख टन तूरडाळ दरवर्षी लागते. देशातील स्थानिक उत्पादन २८ ते ३४ लाख टन इतके आहे. उर्वरित तूरडाळ आयात करावी लागते. २०२० मध्ये १६ लाख टन, २०२२ मध्ये ९ लाख ६५ हजार टन आणि आता ९ लाख टन आयात केली जाऊ शकते. एल-निनोच्या प्रभावामुळे देशात तुरीचे उत्पादन घटण्याची शक्यता आहे. भारताने मोझांबिकसोबत वर्षाला दोन लाख टन तूर आयातीचे करार केले आहेत. म्हणजेच मोझांबिक भारताला दोन लाख टन तूर देणार आहे. मोझांबिकमधील निर्यातदारांनी कराराएवढी तूर भारताला दिली. मोझांबिकने स्वस्त भावात आणखी तूर देण्यास नकार दिल्यानंतर भारताने दबाव वाढवला होता. पण मोझांबिकमधील निर्यातदारांनी कोर्टात धाव घेतली होती. मोझांबिकमध्ये अतिरिक्त दीड ते दोन लाख टन तुरीचा स्टॉक आहे. कोर्टाने निर्यातीसाठी दबाव टाकू नये असे सांगत निर्यात रोखली होती. पण सरकारने पुन्हा शेतकरी हिताचा दाखला देत, भारतासोबत संबंध बिघडले आणि करार रद्द झाला तर शेतकऱ्यांचे हाल होतील, असे सांगत कोर्टाकडे अपिल केले होते. पण कोर्टाने पुन्हा निर्यातदारांच्या बाजुने निकाल दिले.

तुरीचे भाव ९५०० वर गेले असून

बफर साठ्यातील तुरीचे मोठ्या प्रमाणात वितरण आणि आयातही वाढल्यामुळे तुरीचे भाव २५०० ते ३००० रुपये प्रति क्विंटलने घटुन सरासरी ९५०० रुपये प्रति क्विंटलपर्यंत आले आहेत. डाळीची आयात मोठ्या प्रमाणात होत आहे. मोसमी पावसाच्या अनियमिततेमुळे तुरीची उत्पादकताही घटण्याचे अंदाज असल्यामुळे तुरीची आयात वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.





राज्यात कांदा खरेदीला सुरुवात झाली आहे. राष्ट्रीय ग्राहक सहकारी संघ म्हणजेच एनसीसीएफ आणि नाफेडने राज्यात कांदा खरेदीला सुरुवात केली असून, प्रत्येकी एक लाख यापप्रमाणे दोन लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना सरासरी २६२३.७० प्रति क्विंटलप्रमाणे भाव दिला जाईल, अशी माहिती एनसीसीएफच्या व्यवस्थापकीय संचालिका अनिस जोसेफ चंद्रा (दिल्ली) यांनी नाशिकमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत दिली. देशातील ६५ ते ७० टक्के कांदा नाशिक जिल्ह्यातून खरेदी केला जाणार असून नाशिकसह अहमदनगर, धुळे, पुणे, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर आदी लगतच्या जिल्ह्यांतून खरेदी सुरू झाली आहे. शेतकऱ्यांकडून कांदा घेताना एनसीसीएफ किंवा नाफेडलगतच्या मार्केट कमिटीमधील बाजारभावाच्या सरासरीने भाव शेतकऱ्याला दिला जाणार आहे. भारतातून कांद्याची निर्यात बंदी जाहीर करताच पाकिस्तान मधून कांद्याची मागणी मोठया प्रमाणात वाढली. परिणामी पाकिस्तानमधील कांद्याचे भाव जवळपास ४३ टक्केने वाढले. आता पाकिस्तानचे सरकार कांद्याच्या निर्यातीवर निर्बंध घातले असून देशांतर्गत उपलब्धता आणि भाव नियंत्रणात ठेवण्याचे प्रयत्न केले जात आहे. नेपाळला भारताकडून होत असलेली कांद्याची निर्यात बंद होताच चीनकडून कांद्याची खरेदी सुरु केली आहे. कांद्याचे भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी व उपलब्धता वाढविण्यासाठी नेपाळसह बांग्लादेश ही प्रयत्न करत आहे. केंद्रसरकारने दि.७ डिसेंबर रोजी कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली. त्यानंतर कांद्याच्या दरात सातत्याने घसरण सुरु आहे. याच कालावधीमध्ये पोळ कांद्याची आवक दुप्पटीने वाढली. त्यामुळे भावात आणखी मोठी घसरण दिसुन आली. कांदा





उत्पादकांना मोठा फटका बसल्यामुळे पुन्हा एकदा निर्यात सुरु करण्याची मागणी शेतकरी करत आहेत.

देशांतर्गत बाजारपेठेतील कमी मागणीमुळे हळदीचे वायदे बाजार दबावाखाली दिसून आले. मागील वर्षी हळदीची निर्यात ११.१७ हजार टन होती जी आता घसरून ऑक्टोबर २०२३ मध्ये १०.३१ हजार टनावर आली आहे. वर्ष २०२४-२५ मध्ये उत्पादनात घट झाल्यामुळे हळद-बाजारात सकारात्मक बदल होण्याची शक्यता आहे. सध्या हळदीला सरासरी ११००० रुपये प्रतिक्विंटल इतका दर मिळत आहे. नोव्हेंबर महिन्याच्या शेवटी झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचा कापूस ओला झाला आणि दर घसरला. कापसाला ७०२० रुपये प्रतिक्विंटल इतका हमीभाव मिळाला असला तरी व्यापारी ६३०० ते ६५०० रुपये प्रतिक्विंटल दराने कापूस खरेदी करीत आहेत. नाफेड आणि सीसीआयची खरेदीही अद्याप सुरु झाली नाही. कापसाला भाव मिळत नसल्याने जवळपास ७५% कापूस शेतकऱ्यांच्या घरी पडून आहे.

भाव कमी असल्याने उत्पादक विकण्याच्या मनस्थितीत नाही. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना आयात शुल्कात 50% अनुदान मिळणार आहे. संत्रा निर्यातदारांना बांगलादेशने आयात शुल्क वाढवल्यामुळे आर्थिक फटका सहन करावा लागला. अनेक शेतकऱ्यांना त्यांचे संत्रा पीक हे परदेशी न पाठवता स्थानिक बाजारपेठेत पाठवावे लागले. त्याचा परिणाम बाजारभाव गडगडल्याने आर्थिक फटका सहन करावा लागला. त्यासाठी राज्य शासनाने १६९ कोटी ६० लाख रुपयांची तरतूद केली असून, संत्रा निर्यातदार शेतकऱ्यांना निश्चितपणे दिलासा दिला जाईल, अशी माहिती पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी विधानसभेत दिली. नोव्हेंबर महिन्यात २८१ कोटी रुपयांची निर्यात झाली आहे. नोव्हेंबर महिन्यात भारतातून निर्यात २.८३ टक्यांनी घटली, पण तरीही २,८१,५०० कोटी रुपयांच्या वस्तू निर्यात झाल्या. मागील वर्षी नोव्हेंबर महिन्यात २९० हजार कोटी रुपयांची निर्यात झाली होती. केंद्रीय वाणिज्य विभागाने प्रसारित केलेल्या माहितीनुसार आयात आणि निर्यात मधील तफावत हळूहळू कमी होत आहे. भारतातून निर्यातीला प्रतिबंध असतानाही ४.४ लाख कोटी रुपयांची निर्यात २०२२-२३ हंगामात झाली. भात, गहू आणि साखरेची निर्यात सर्वाधिक झाली. यावर्षी निर्यातीला बंधने अधिक असल्याकारणाने ३५ ते ४० हजार कोटी रुपये निर्यात घटू शकते. पुढील वर्षांपासून फळ, भाजीपाला, पोल्ट्री आणि डेअरी उत्पादनाची निर्यात चांगली वाढेल असे वाटते.

# आपण मुलाबाळांना काय संस्कार देतोय ?




शाम हेडाऊ
संपर्क क्र.9834301568

आधुनिक केसरी

**डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांनी हा देश विश्वगुरूपदी आसनस्थ होईल असं स्वप्न पाहिला होत. तद्वतच स्वामी विवेकानंद यांनी सुद्धा या देशाला गतवैभव प्राप्त करून द्यायच असेल तर मला सिंहासारखं हृदय असलेले आणि लोहांच्या नसा असलेले तरुण मला हवे आहेत अस आवाहन केलं होतं. देशाच्या कोणशीलेला आकार देण्यासाठी हे सर्व तरुण सगळ्यात महत्त्वाची भूमिका बजावत असतात आणि या तरुणाईच्या मनगटात असलेल्या ताकदीवरच हा देश पुन्हा एकदा विश्वगुरूपती आसनस्थ होईल अशी अपेक्षा स्वामी विवेकानंद असो किंवा मग डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम असो त्यांनी बघितली होती.**

पण आज जेव्हा आम्ही आपल्या देशातल्या तरुणाईचा विचार करतो तेव्हा हा देश आज कुठे उभा आहे हे तुम्ही आम्ही सगळेच जाणतो. स्वामी विवेकानंदांना अपेक्षित तरुण आणि एपीजे अब्दुल कलाम यांना अपेक्षित असलेला युवा जर घडवायचा असेल तर आम्ही आमच्या मुलांवर काय संस्कार करत आहोत ? त्यांना कसं घडवतो आहोत ? यावर या देशाच्या कोणशेलेला आकार देणारी तरुण पिढी उभी राहणार आहे . मला आजही आठवत आमचं लहानपण .आपलं दप्तर आपल्या हातात घेऊन किंवा खांद्यावर पाठीमागे लटकवून आम्ही शाळेत जायचो. शाळेतून आलं की ग्राउंडवर बेधुंद होऊन खेळायचं व त्यामध्ये धाबडधुबड , धावडणी शिपडणी , संखल, असो लगोरी असो, चोर पोलीस असो ,क्रिकेट असो, कबड्डी असो , खो खो असो असे एक ना अनेक खेळ होते हे सगळं खेळ दमछाक होईपर्यंत खेळायचं आणि सायंकाळी वापस घरी यायचं तेही आईने बोलावल्यानंतर. एकदा सायंकाळी घरी आलं की लगेच हातपाय धुवायला आई सांगायची देवापुढे बसवायची शुभम करोति असो शांताकारम असो की या कुंदेन्नो असो अशा वेगवेगळ्या प्रार्थना आई म्हणून घ्यायची. कधीकधी रामरक्षा पाठ करून घ्यायची . हे सगळं होत असताना आम्ही घडत होतो . रात्र झाली की अभ्यासाला बसायचं रात्री झोपताना आई पाठ पाढे करून घ्यायची. बे एक बे, बे दुने चार असं करता करता ते पाढे 30 पर्यंत कधी गेले हे आम्हाला कळलच नाही . त्याचा फायदा मला आजही होतो आहे आणि असं करत करत आम्ही घडत गेलो . धावताना पायाला ठेच लागायची पायात काटे रुतायचे काच जायचा , पाय , अंगठा रक्तरेण्द व्हाचा. मारापिटी ही व्हायची मित्रांसोबत. पण कधीही आई-वडील मित्रांच्या मध्ये पडले असतील किंवा मित्रांच्या आई-वडिलांना कोणी बोललं असेल असं कधी झालं नाही. सगळीकडे आनंदी आनंद वातावरण असायच. घरी आल्यावर दोन झापड्या मारल्या की पुन्हा दुसऱ्या दिवशी खेळायला जायची तयारी असायची. हे सगळं होत होतं लहानपनीच आम्ही आमचे दप्तर खांद्यावर लटकून घेऊन जायचं म्हणून असेल कदाचित पण आमचे खांदे मात्र मजबूत झाले. आम्ही पायी जायचो शाळेमध्ये म्हणून आम्हाला चालण्याची सवय लागली. आम्हाला सकाळी उठाव लागायचं. सकाळी साडेसातची शाळा असायची. आणि त्या घाईने आई सकाळी उठवायची त्यामुळे , सकाळी पहाटे उठायची सवय लागली. पहाटे उठण्याच्या या सवयीचा फायदा आजही होतो आहे. हळूहळू करत शाळेतले संस्कार घडत होते. शाळे मध्ये सुद्धा एखाद्या वेळेस गृहपाठ करून गेले नाही तर गुरुजी हातावर छडी मारायचे ,पाठीवर दणका द्यायचे. आणि असं होत असलं तरी सुद्धा कधीही कुठले पालक , माझे आई वडील असो की इतर कोणाचे आई वडील असो कधी शाळेत जाऊन आमच्या मुलाला का मारलं ? असा प्रश्न कधीही कोणत्या पालकांनी तेव्हा कधी केलेला नाही . हे सगळं होत होतं म्हणून कुठेतरी तो कणखरपणा होता. कुठेतरी तो मार खाण्याची तयारी असूनही त्याच्याबद्दल तक्रार नसायची .आपण चुकलो आहोत ही जाणीव तेव्हा व्हायची. हे सगळं एक संस्कार म्हणून आमच्यावर घडत गेलं. आई वडिलांना उलट बोलण्याची हिंमत नव्हती एखाद्या वेळेस रागाच्या भरात निघालच तर कानाखाली जोरदार आवाज व्हायचा आणि त्यानंतर पुन्हा कधीही आपल्या आई-वडिलांना उलटून बोलायचं नाही किंवा जोरात बोलायचं नाही मोठ्या आवाजात बोलायचं नाही हे संस्कार आमच्यावर होत गेले. या संस्कारांच्या माध्यमातूनच आम्ही घडत गेलो. 40 ते 50 च्या जवळ पोहोचली आजची ही पिढी याच संस्कारातून घडत गेली. आणि आज या सगळ्यांचा फायदा असा होतो आहे की सामूहिक खेळ आम्ही खेळत गेलो त्यामध्ये हरायचो जिंकायचो, मॅच लावायची ती हरायची . हरल्यानंतर मारपीटी व्हायची. परंतु नंतर पुन्हा लगेच सगळे एकत्र येऊन दुसरी मॅच त्याच ग्राउंडवर तितक्याच आनंदाने तितक्याच हर्षोलहासामध्ये, तितक्याच आनंदात ,जोश मध्ये खेळायचो की आता आपल्याला जिंकायच आहे. हे सगळं घडत गेलं, हे सगळे खेळ आम्ही खेळत गेलो म्हणून कदाचित आम्ही मजबूत होत गेलो .आम्ही अपयश पचवायला शिकलो ,आम्ही समूहभावना शिकलो ,आम्ही एकमेकांचे सुखदुःख वाटून घेण्यात घेण्यात यशस्वी ठरत गेलो, आम्ही घडत गेलो आणि या घडण्यातूनच आज एक कणखर पिढी या देशासमोर उभी आहे. पण आता जेव्हा मी आजच्या लहान मुलांकडे पाहतो त्यांच्या आई-वडिलांकडे पाहतो त्यांच्या शाळेतल्या शिक्षणाकडे पाहतो तेव्हा मात्र अनेक प्रश्न निर्माण होतात .आपण आपल्या मुलांना अपंग करत आहोत का ?शारीरिक दृष्ट्या ? मानसिक दृष्ट्या ? त्यांना मजबूत करण्यामध्ये आपण कुठेतरी अडथळा आणत आहोत का ? असा प्रश्न मला सातत्याने पडतो. लहान मुलांना बाहेर खेळू द्यायचं नाही ,त्यांना सायकल घेऊन जाऊ द्यायचं नाही, ग्राउंड वरचे खेळ तर जवळजवळ बंदच झालेले आहेत. का तर डस्ट असते ,जखमा होतात ,माती लागते म्हणून त्यांना बाहेरच्या ग्राउंड वरचे खेळ खेळणे आजच्या आई-वडिलांनी बंद केले आहेत. शाळेतल्या शिक्षणाची तर बोंबाबोंबच आहे. हो मी हा शब्द



जाणीवपूर्वक वापरतोय. शाळेमध्ये समजा एखाद्या शिक्षकांनी आपल्या मुलाला मारलं त्याने गृहपाठ जर केला नाही किंवा शाळेत काही मस्ती केली असेल म्हणून मारलं तर लगेच दुसऱ्या दिवशी पालक शाळेत हजर होतात. आमच्या मुलाला का मारल ? म्हणून त्या शिक्षकाची झाडाझडती होते. आणि पालक सभेमध्ये हा मुद्दा उपस्थित करून संबंधित शिक्षकाला जाब विचारला जातो. अशाने विद्यार्थ्यांना वळण लागेल का ? हा प्रश्न मात्र आपण कधीच स्वतःच्या मनाला विचारत नाही. हल्ली मोबाईल वरचे गेम वाढलेत, कम्प्युटरवरचे गेम वाढले त्याच्यामुळे मुलं घराच्या बाहेर पडत नाहीत. त्यांना उन्हाचा त्रास व्हायला लागलाय .त्यांना बाहेर गेल्यानंतर स्किनचे डिसीज निर्माण व्हायला लागलेत . थोडीशी थंडी पडली की मुलांची तब्येत बिघडायला लागली आहे .हे असं सगळं का होतं ? मुलांमध्ये लठ्ठपणा वाढत चाललाय . हे असं सगळं का होतंय याचा मात्र आजच्या आई-वडिलांना आपल्या लहानपणीचा विसर पडल्यामुळे हे सगळं घडतं असं मला वाटतं. आजच्या पालकांनी आपल्या मुलांना खरंतर स्पर्धेतला घोडा करून ठेवलेला आहे . आजच्या पालकांना असं वाटतं की माझा मुलगा शाळेत पहिला नंबर नी ही आला पाहिजे , तो डान्स मध्ये पण पहिला नंबर यायला पाहिजे, त्याच्या मध्ये पण तो फर्स्ट असलाच पाहिजे , त्याला क्रिकेटमध्ये इंटरेस्ट असायला पाहिजे ,त्याला नृत्यातही आवड असली पाहिजे , त्याला स्केटिंगही करता आलं पाहिजे ,त्याला चेस पण खेळता आलं पाहिजे, असे एक ना अनेक अशा आजचे पालक आपल्या मुला मुलीकडून करायला लागले आहेत. आणि मग यातून शाळा संपली की गणिताचा क्लास, अबॅकस चा क्लास, त्याच्यानंतर ग्राउंड वर जाणे, तिथे कराटे शिकणे किंवा खेळ शिकणे याच्यात मुलाची दमछाक होते आहे .मुलाचं लहानपण त्यांना जगताच येत नाहीये. त्यांना त्याच्या लहानपणाचा आनंदच घेता येत नाहीये .मनासारखं जगनच त्यांना मुश्किल होत चालले आहे . हे आजचे पालक लक्षातच घेत नाहीत असं मला वाटतं आणि हे माझं वैयक्तिक असं स्पष्ट मत आहे .पालकांनी जर आपल्या मुलाकडून इतक्या अपेक्षा केल्या तर या अपेक्षांच्या ओझ्याखाली आपला मुलगा दबून जातोय, त्याचा बालपण आपण हिरावून घेतोय आणि आपल्या आवाजवी अपेक्षा आपण मुलावर लादतोय हे पालकांना का कळत नाही ? हा माझ्यासमोर असलेला खूप मोठा प्रश्न आहे .माझं स्पष्ट मत आहे की मुलांचा कल ओळखून पालकांनी आपल्या मुलाला त्या दिशेला जायला मोकळीक द्यावी. खरं तर लहानपणी त्यांना त्यांचं लहानपण जगू द्यावं .मनसोक्त खेळू द्याव ,मित्रांमध्ये बागडू द्यावं, ग्राउंड वर खेळू द्यावं, हवं तितक त्याला पडू द्या ,त्याचे टोंगळे फुटू द्या, त्याचे ढोपर फुटू द्या, काहीही हरकत नाही. तुमचेही फुटले होते, माझेही फुटले होते आणि हे ढोपर फुटले टोंगळे फुटले ,पायाला ठेचा लागल्या म्हणून आज आपण आलेल्या आव्हानाला सामोरे जातो आहोत., आपण खचत नाही आपण लढतो आहोत . पण आजच्या मुलांमध्ये मात्र ही खचून जाण्याची प्रवृत्ती ,अपयश आल तर त्या अपयश पचवण्याची शक्ती मात्र त्यांच्यामध्ये निर्माण होताना दिसत नाही. आणि याला कारण आजचे पालक आहेत असं माझं स्पष्ट मत आहे. बर यातून होतंय काय तर दहावी मध्ये मुलगा नापास झाला तर तो गळफास घेतोय, बारावीत नापास झाला गळफास घेतोय, एमबीबीएस ला, मेडिकलला, इंजीनियरिंगला नंबर लागला नाही म्हणून तो आत्महत्या करतोय. अपयश पचवण्याची क्षमताच विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होत नाहीय. आणि, याला कारण म्हणजे लहानपणापासून त्या मुलांवर होत असलेले संस्कार आहेत. हे संस्कार जर योग्य वेळी योग्य पद्धतीने होत गेले तर, निश्चितच त्याचा फायदा पुढे जाऊन होतो आणि त्यातून एक चांगला आदर्श युवा उभा राहतो असं मला वाटतं. आणि म्हणून आपण मुलांना कसे संस्कार देतोय आपण मुलांना कसं घडवतोय यावर या देशाची तरुण पिढी येणाऱ्या काळामध्ये उभी राहणार आहे . स्वामी विवेकानंदांना अपेक्षित असलेला युवा असो की डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांना अपेक्षित असलेला तरुण असो, तो घडवायचा असेल तर आजच्या या लहान पिढीला चांगलं मनसोक्त खेळू द्या, त्यांच्यावर चांगले संस्कार करा, शाळेमध्ये जर त्यांना त्यांचे शिक्षक काही कारणास्तव मारत असतील, रागावत असतील तर त्या शिक्षकाला फैलावर घेणं बंद करा. आणि हे लक्षात घ्या की, आपण जे संस्कार करू, आपण ज्या पद्धतीने या मुलांना घडवू तसेच हे मुलं पुढे घडत जातील. या देशाला एका कणखर नेतृत्वाची गरज आहे, या देशाला एका कणखर तरुणाची गरज आहे .आणि त्यासाठी आजपासूनच आपण आपल्या मुलांना कसं घडवायचं ? त्यांना काय संस्कार द्यायचे ? याच्यावर सगळ्यांनी विचार करावा ,मंथन करावं, कौटुंबिक चर्चा व्हावी आणि त्यातून आपल्या मुलाबाळांचे भविष्य घडवावं असं मला वाटतं म्हणून हा लेखन प्रपंच.

# मनुस्मृती दहन म्हणजे मानवमुक्ती मार्ग



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**जगातील सर्वात विद्वान महामानव जर पुस्तकावर स्वतः पेक्षा जास्त प्रेम करून पुस्तकासाठी स्वतंत्र घर बांधत असतील, प्रत्येक पुस्तकाला रक्तापेक्षा जास्त महत्व देऊन सांभाळ करत असतील, आणि मनुस्मृती नावाचे पुस्तक जाळत असतील तर नक्कीच ते पुस्तक पुस्तक नसुन काहीतरी घातक बाब असेल. म्हणून ज्यांनी सर्वात जास्त पुस्तके वाचली त्यांनी मनुस्मृती जाळणे म्हणजे मनुस्मृती नावाचे पुस्तक मानवी विकासाला किती घातक असेल याची कल्पना येते.**

बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृती जाळून मानवमुक्तीचा मार्गच मोकळा करून मानवाला वैचारिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य देऊन मानसन्मान बहाल तर केलाच परंतु हजारो वर्षांपासून मनुस्मृती च्या विषमतावादी, मानवविरोधी विचाराला गाडण्याचे धाडस करून जागतिक परिवर्तन केले. मनुस्मृती ने माणसा माणसात विष पेरुन मानसाला हीन, तुच्छ समजून एकाच वर्णाच्या हाती सत्ता, संपती व सन्मान दिला. निव्वळ विषमता प्रस्थापित करून वैचारिक व मानसिक गुलाम बनवून मानवाचे हक्क अधिकार हिसकावून घेऊन माणसाला पशुपेक्षा ही हीन वागणूक देऊन त्यांचे शोषण करून त्यांच्या वर वैचारिक, मानसिक व सामाजिक सत्ता गाजवून स्वतः लाच श्रेष्ठ समजून इतरांना तुच्छ लेखण्याची संस्कृती विकृत लोकांनी निर्माण केली होती. विकृतीला, विषमतेला आणि गुलामीला संस्कृती व संस्कार मानुन विषमतावादी वर्णातील कामे त्याच वर्णातील लोकांनी करणे म्हणजे धर्माचे पालन करणे होते. थोडक्यात काय तर माणसाच्या कला गुणांना, गुणवत्ता व बुद्धीमत्तेला गौण समजून वर्णातील कामे करण्यातच धन्यता माणली जायची. वर्णाची निर्मीती च मुळात काल्पनिक व थोतांडाच्या आधारे करून लोकांना अज्ञानी व अशिक्षित ठेवून स्वतः चे वर्चस्व स्वतः च श्रेष्ठ सांगण्यासाठी केली गेली. हळूहळू वर्णव्यवस्था जास्त काळ टिकणार नाही आणि लोकांना फार काळ गुलाम करता येणार नाही, लोकांना मुर्ख बनवता येणार नाही म्हणून कामाचे रुपांतर जाती मध्ये जातीव्यवस्था मजबूत केली. प्रत्येक जात स्वतःला इतर जाती पेक्षा कनिष्ठ व वरिष्ठ समजण्यात मोठेपणा मानून मानसिक व वैचारिक गुलामगिरी स्विकारण्यात धन्यता मानत होती. माणसाचा विटाळ वर्ण आणि नंतर जातीच्या आधारावर करून, माणसाचे स्थान त्याच्या जातीवरून निर्धारित केले जात होते. गुणवत्ता, बुद्धीमत्ता यांना कुठेही वाव नसल्याने, इतर वर्णाला शिक्षणाचा व वैचारिक आणि मानवी स्वातंत्र्याचा अधिकार नाकारून स्वतः चा गवगवा स्वतःच्या च हाताने करून घेणाऱ्यांची संस्कृती किती विकृतीने माखलेली असेल यांचा अंदाज येतो. माणसाला माणसाचा स्पर्श होणे पाप समजले जाणे, माणसाला माणसा सोबत जेवन करणे, बसणे, सार्वजनिक व नैसर्गिक मालमत्तेचा सर्वांनी समान वापर करणे याला पाप माणणाऱ्या विकृती चे कायदे येथे होते. स्त्रियांना तर धर्माच्या चालीरीती आणि माणूस अशा दुहेरी गुलामगिरी मध्ये फसवणून महिलांचे अस्तित्व, मान सन्मानच नष्ट केला होता. महिलांना केवळ उपभोगाचे साधन समजून तीला चार भिंतीच्या आत डांबून ठेवण्याची विकृती याच मनुस्मृती आहे. नवरा किती ही चारित्र्यहीन, व्यसनाधीन असेल तरीही स्त्रियांनी पतीची सेवा करावी म्हणजे माणसाचे गुलामच रहावे असे संस्कार होते. ब्राह्मण जे खातो ते ब्राम्हणाची कमाई आणि इतर लोक जे खातात तेही ब्राम्हणांचे खातात अशी हीन व तुच्छ वागणूक मानसाला देऊन संस्कृती व माणुसकी ला काळीमा फासणारी मनुस्मृती होती. मनुस्मृतीने शेती करणाऱ्यांनाही हीन व तुच्छ समजले. एवढी नैतिकता नसलेले विचार मनुस्मृती च्या माध्यमातून समाजात पसरवून मनुस्मृतीलाच कायदा समजून येथे विषमतावादी, अस्पृश्यता वादी, अज्ञान व थोतांड वादी आणि एकाच वर्णाला हक्क अधिकार बहाल करून त्यांचेच वर्चस्व इतरांना मान्य करायला लावणारी मनुस्मृती डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जाळून मानव मुक्तीचा मार्ग मोकळा केला. माणूस जाणीने व वर्णाने श्रेष्ठ नसुन विचार व कर्म व ज्ञानाने श्रेष्ठ असतो. सार्वजनिक व नैसर्गिक साधनसंपतीचा वापर प्रत्येक व्यक्ती करू शकतो मग तो कोणत्याही वर्णाचा जातीचा असो. शिक्षण, हक्क अधिकार सर्वांना आवश्यक असतात, प्रत्येकाला स्वतः चा सन्मान मान असतोच आणि तो जपल्या गेलाच पाहिजे. महिलांना सुद्धां माणसा प्रमाणे जिवन जगण्यचा, शिक्षण घेण्याचा, व इतर हक्क अधिकाराचा उपभोग घेण्याचा अधिकार आहे, महिला आणि पुरुष यांच्या मध्ये हक्क अधिकार संधी, सन्मान समान असायला पाहिजे या विचाराचे बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर हे होते. माणसाच्या अधोगतीचे, विषमतेचे, द्वेषाचे आणि गुण, कर्म यांचा विचार न करणाऱ्याचे मुळ हे मनुस्मृती आहे आणि हिच मनुस्मृती जाळून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी खऱ्या अर्थाने सर्वात मोठी क्रांती केली. बऱ्याच आजही मनुस्मृती ची विकृती आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर व संधिनाची महती कळाली नाही. मनुस्मृती नाकारण्यासाठी आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधान स्वीकारण्यासाठी व्यक्तीची बौद्धिक पातळी सुदृढ व मनात मानवताव व समतावाद पाहिजे. ज्यांना स्वतः चा इतिहास माहिती नाही, स्वतः च्या गुलामीची जाणीव नाही अशा लोकांना मानवी स्वातंत्र्य व मानवी विकास पचणे शक्य नाही. लोकांना अज्ञान, थोतांड व विषमतावादी चुकिच्या गोष्टी लवकर कळतात परंतु विज्ञान, सत्य आणि समतावादी गोष्टी कळत नाहीत याचे कारणच आहे की लोकांचा बौद्धिक विकास पाहिजे तसा झाला नाही. मानवमुक्ती, मानवीस्वातंत्र्य, मानसिक गुलामी या संकल्पना आजही लोकांच्या विचार शक्तीच्या पलिकडच्या आहेत. ज्यांना सत्य, विज्ञान समजले व जे समता बंधुता यावर विश्वास ठेवतात आणि मनुस्मृती ला मुठमाती देऊन वैचारिक दहन करतात त्यांनाच येथे पुरोगामी म्हटले जाते. मनुस्मृती चा आजही काही लोकांवर एवढा पगडा आहे की स्वतःला थोड्याफार प्रमाणात दोन तिन पुस्तके वाचुन विद्वान व अभ्यासक समजणारे लोकही मनुस्मृती चे विचार आचरणात आणताना दिसतात. हिच मोठी वैचारिक दिवाळखोरी आहे. महिलांना शिक्षण, नोकरी, हक्क अधिकार, मान सन्मान हे सगळं मनुस्मृती दहन केल्यानेच मिळाले. मनुस्मृती नुसार तर स्त्रियांना व्यक्ती म्हणून ही स्विकार केला गेला नाही. पशुपेक्षा हीन व तुच्छ समजून तिला मानसिक गुलाम बनवून ठेवले. डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच खऱ्या अर्थाने आधुनिक भारताचे शिल्पकार आहेत. कारण ज्यांनी मनुस्मृती जाळून ते कायदे मान्य केले नाही तेच देशाच्या आदर्श व मानवतावादी संविधानाचे शिल्पकार झाले. मनुस्मृतीने ज्यांना शिक्षण नाकारले, हक्क अधिकार नाकारले, माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नाकारला, उच्च शिक्षीत व विद्वान असुनही अस्पृश्यता पाळून माणसाच्या शरीराचा विटाळ होत होता, अडाणी लोकांना ज्यांच्या विद्वतेची किंमत नव्हती अशाच महापुरुषाने देशाचे संविधान लिहुन सर्वांना समान हक्क अधिकार बहाल केले, सर्वांसाठी समान शिक्षणाचे द्वारे खुले केले, सर्वांना समान हक्क अधिकार बहाल करून त्यांचे संरक्षण केले. यालाच तर जागतिक क्रांती म्हणतात. रायगडाच्या पायथ्याशी मनुस्मृती चे दहन करून एक वैचारिक क्रांती ची सुरवात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केली. आणि संविधानाची निर्मिती करून कायमस्वरूपी मनुस्मृती कायदेशीर हद्पार केली. म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी एकाच नाही तर दोनदा वेगवेगळ्या माध्यमातून मनुस्मृती दहन करून भारतीय लोकांना, भारतीय स्त्रियांना मानसिक व वैचारिक स्वातंत्र्य बहाल करून गुलामीतून सुटका करून मानसाला माणूस बनवले. मनुस्मृतीने पेरलेले वैचारिक व सामाजिक विष डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिंसेबर रोजी रायगडाच्या पायथ्याशी नष्ट करून विषमतावादी व मनुस्मृती ची व्यवस्था माणणाऱ्या स्वंयघोषीत श्रेष्ठ लोकांना वैचारिक फटका तर दिलाच आणि ज्यांनी मनुस्मृती जाळली त्यांनीच संविधान निर्माण करून माणवमुक्ती चा मार्ग खुला केला. म्हणून मनुस्मृती दहन दिवस साजरा करून दरवर्षी मनुस्मृती ची विकृती लोकांना सांगावी लागणार आहे. कारण मनुस्मृती ला माणुन माणसा माणसात भेद निर्माण करणारे लोक पुन्हा मनुस्मृती चे राज्य आणून लोकांना गुलाम बनवून देशाला दारिद्र्य व मागासलेपणा च्या खाईत लोटताना दिसत आहेत. लोकांच्या कल्याणाचा मार्ग लोकांना सदैव दिसण्यासाठी जेव्हा जेव्हा मनुस्मृती व त्यांच्या विचाराचे लोक डोके वर काढण्याचा प्रयत्न करतील तेव्हा तेव्हा मनुस्मृती दहन करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या मानवमुक्तीचा मार्गाने जाने अगत्याचे ठरते. कारण मनुस्मृती दहण झाली तेव्हाच माणसाला माणुसपण व विकासाच्या संधी निर्माण झाल्या वर समता प्रस्थापित झाली.

# चांदवड-मनमाड रोडवर वाहन अडवून लुटमार करणारे दरोडेखोर जेरबंद

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** दि. १७ डिसेंबर २०२३ रोजी मध्यरात्री चांदवड ते मनमाड रोडवर फिर्यादी आमीर उर्फ शोएब सैय्यद व साक्षीदार सर्फराज ताडे असे त्यांचेकडील पिकअप वाहन घेवून मनमाडच्या दिशेने जात असतांना म्हसोबा मंदीर परिसरात दोन मोटार सायकलवर आलेल्या अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीचे पिकअप वाहन अडवून फिर्यादी व साक्षीदार यांना चाकूचा धाक दाखवून त्यांचेकडील रोख रक्कम अडीच लाख रूपये व दोन मोबाईल फोन असा एकूण २ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल बळजबरीने चोरून नेल्याबाबत चांदवड पोलीस ठाणेस गुरनं ५१२/२०२३ भादवि कलम ३९५,१२० (ब), ३९४,३४१,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक शहाजी उमाप व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव अनिकेत भारती यांनी सदर घटनेचा आढावा घेवून स्थानिक गुन्हे शाखेचे पथक व चांदवड पोलीसांना वरील गुन्हा उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या होत्या. त्यानूसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी सदर गुन्हयातील फिर्यादी याने आरोपींचे सांगितलेले वर्णन,



तसेच घटनेच्या हकिकती प्रमाणे तांत्रिक बाबींची पडताळणी करून मिळालेल्या गोपनीय बातमीच्या आधारे यातील गुन्हेगार हे मनमाड शहरातीलच असल्याचे खात्रीशीररित्या समजले. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने मालेगाव नाका परिसरात सापळा रचून सराईत गुन्हेगार इंजमाम उर्फ भैय्या सलीम सैय्यद, वय २४, रा. ५२ नंबर, जमदाडे चौक, मनमाड, व उजेर आसिफ शेख, वय २२, रा. भगतसिंग मैदान, दत्तमंदिर रोड, मनमाड यांना शिताफीने ताब्यात घेतले. त्यांचेकडे वरील गुन्हयाचे तपासात चौकशी केली असता, त्यांनी त्यांचे साथीदार मोईन इब्राहिम सैय्यद, ओम शिरसाठ, हर्षद बि-हाडे, सर्व रा. मनमाड यांचेसह मिळून सदर गुन्हा केला असल्याची कबुली दिली आहे. यातील ताब्यात घेतलेले आरोपी इंजमाम उर्फ भैय्या सैय्यद व उजेर शेख यांचेकडे वरील गुन्हयाचे उर्फ शोएब तपासात अधिक चौकशी केली असता, त्यांनी सदर गुन्हयातील फिर्यादी पिकअप चालक आमीर उर्फ जब्बार सैय्यद, वय २३, रा. आय. यु.डी.पी., भवानी चौक, मनमाड याचे सांगणेवरून कट रचून चांदवड ते मनमाड रोडवर म्हसोबा मंदीर परिसरात पिकअप वाहन अडवून चाकूचा धाक दाखवून रोख रक्कम व मोबाईल फोन बळजबरीने चोरून नेले असल्याचे तपासात समोर आले आहे. सदर आरोपींचे कब्जातून वरील गुन्हयात जबरीने चोरून नेलेली रोख रक्कम २ लाख ४८ हजार ७०० रूपये हस्तगत करण्यात आली आहे. यातील फिर्यादी आमीर उर्फ शोएब सैय्यद याचे व गाडी मालक सर्फराज फारूक ताडे, रा. मनमाड या दोघांमध्ये यापुर्वी पैशांचे देवाण - घेवाणीवरून वाद होते. या कारणावरून फिर्यादी आमीर उर्फ शोएब सैय्यद यानेच कट रचून त्याचे वरील साथीदारांसह सदर गुन्हा केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. सदर गुन्हयात ताब्यात घेतलेले आरोपी इंजमाम उर्फ भैय्या सलीम सैय्यद व उजेर आसिफ शेख यांचेवर मनमाड पोलीस ठाणेस खून व खूनाचा प्रयत्न असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहे. सदर आरोपी व फिर्यादी आमीर उर्फ शोएब सैय्यद यांना वरील गुन्हयात अटक करण्यात आली असून, मा. न्यायालयाने त्यांची पाच दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली आहे. सदर गुन्हयातील इतर आरोपीचा पोलीस पथक कसोशीने शोध घेत असून चांदवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांचे मार्गदर्शनाखाली पो.उ.नि सुरेश चौधरी, पो.हवा अमोल जाधव यांचे पथक पुढील तपास करीत आहे. नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक शहाजी उमाप व अपर पोलीस अधीक्षक अनिकेत भारती यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, स.पो.नि गणेश शिंदे, पो.उ.नि नाना शिरोळे, पो.हवा नवनाथ सानप, पो.ना विश्वनाथ काकड, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, विशाल आव्हाड यांचे पथकाने वरील गुन्हेगारांना ताब्यात घेवून गुन्हा उघडकीस आणलेला आहे. सदर गुन्हयातील तपास पथकाने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी १० हजार रूपयांचे बक्षीस जाहीर करून तपास पथकाचे अभिनंदन केले आहे.

# पुरोगामी पत्रकार संघाचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राष्ट्रीय पुरोगामी पुरोगामी पत्रकार संघाचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आले असून,संघाचे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी,केंद्रीय कार्यकारणीचे पदाधिकारी राज्य अध्यक्ष संतोष जाधव,राज्य सचिव निलेश ठाकरे,राज्य कार्याध्यक्ष प्रा. दशरथ रोडे राज्य उपाध्यक्ष.गोपाल लाड,राज्य कार्यकारणी च्या सर्व पदाधिकाऱ्यांनी पुरस्कारांना मान्यता दिली आहे.



१) राज्यस्तरीय अण्णाभाऊ साठे साहित्य गौरव पुरस्कार लेखक पवन भगत यांच्या 'ते पन्नास दिवस' या कादंबरीला जाहीर करण्यात आला असून ही कादंबरी कोरोना काळातील लॉक डाऊननंतर हजारो किमी पायदळ प्रवास करणाऱ्या मजुरांची विदारक कथा आहे. ही कादंबरी अनेक प्रादेशिक भाषेत प्रकाशित झाली आहे.तथा अनेक पुरस्कार या कादंबरीला प्राप्त झाले आहे. २)राज्यस्तरीय डॉ.आंबेडकर पत्रकारिता गौरव पुरस्कार रतनकुमार साळवे, संभाजी नगर,यांना जाहीर करण्यात आला आहे.निळे प्रतिक या सप्ताहिकातून सात्यत्याने पुरोगामी विचारांचा वारसा ते चालवत आहे.३) राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ गौरव पुरस्कार निता चापले मुंबई,यांना जाहीर करण्यात आला असून,त्या माजी राष्ट्रीय महिला क्रिकेट खेळाडू,लेखिका तथा समाजिक कार्यकर्ता आहेत.४)राज्यस्तरीय क्रांतिज्योती सावित्री फुले शिक्षक गौरव पुरस्कार विजय भासारकर (मुख्याध्यापक) अंध,मूकबधिर विद्यालय, आनंदवन, वरोरा यांना जाहीर करण्यात आला आहे. अंध, मूकबधिर विद्यार्थ्यांच्या भावना मायेने समजून घेऊन त्यांना ते शिक्षण देतात.५) राज्यस्तरीय 'फातिमा शेख शिक्षण गौरव पुरस्कार' रजिया हेमंत मानकर बल्लारपूर यांना जाहीर करण्यात आला आहे.त्यांनी शून्यातून विश्वनिर्मिती करून माफक फी मध्ये शिक्षण देणारी इंग्रजी शाळेची निर्मिती केली आहे. ६) राज्यस्तरीय 'शहिद भगत सिंग साहित्य गौरव पुरस्कार' श्रुंखल भोयर,नागपूर यांना जाहीर करण्यात आला आहे. वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी त्याचा 'दी स्टडीली चेंज' नावाचा इंग्रजी काव्य संग्रह प्रसिद्ध झाला आहे.७) राज्यस्तरीय 'युवा कला गौरव पुरस्कार' कु.स्नेहल सुनील सिरसाट अकोला, हिला जाहीर करण्यात आला असून,ती बालपणा पासून महापुरुषांचे विचार आपल्या गोड आवाजात समाजात पेरण्याचे काम करीत आहे. या राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण दिनांक २४ फेब्रुवारी २०२४ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर या औद्योगिक नगरीत होऊ घातलेल्या पहिल्या राज्यस्तरीय पुरोगामी साहित्य संमेलनात होणार आहे. सर्व पुरस्कार विजेत्यांना पुरोगामी पत्रकार संघ,पुरोगामी साहित्य संसद महाराष्ट्र च्या सर्व पदाधिकारीच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे...

# ना. मुकुल वासनिक कला महाविद्यालयात श्रमसंस्कार शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव (जामोद) :** राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत तालुक्यातील ग्राम आडोळ बुद्रुक येथील नामदार मुकुल वासनिक कला कनिष्ठ महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराचा शुभारंभ ग्राम तिवडी येथे दिनांक २२ डिसेंबर रोजी संपन्न झाला. संस्थाध्यक्ष यु.बी. धुंदाळे यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. आडोळ बु राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत श्रमसंस्कार शिबिरास प्रारंभ दिनांक २२ डिसेंबर रोजी महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबिराचे ग्राम तिवडी) येथे थाटात उद्घाटन सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे आधारवड श्री यु .बी . धुंदाळे साहेब व प्रमुख मार्गदर्शक गट शिक्षणाधिकारी वामनराव फंड, अमरावती विभागीय परीक्षा मंडळाचे माजी संचालक प्रा. नानासाहेब कांडलकर ,गुलाबरावजी इंगळे, व सागर झनके यांची उपस्थित होतो.

यावेळी प्रा. नानासाहेब कांडलकर यांनी विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले तर सागर झनके यांनी कवितेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे ज्ञानात भर टाकली तर सुधीर ठोंबरे व इंगळे सर यांनी संत गाडगेबाबा यांच्या कार्यावर प्रकाश टाकला यावेळी तिवडीचे युवा सरपंच श्री लहुजी झाल्टे, उपसरपंच मुक्तताबाई जवरे , शाळा समिती अध्यक्ष निवास गई ,पोलीस पाटील विजय घाईत, तंटामुक्ती अध्यक्ष श्री उल्हास गई ,व भीमराव जवरे, आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालक प्रा. एम एस




धांडे तर आभार प्रदर्शन कु. जयश्री भिवटे यांनी केले.

सदिच्छा भेटीः दिनांक २१ ते २७ डिसेंबर पर्यंत चालणाऱ्या ह्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरास शिक्षण संचालक पुणे, शिक्षण उपसंचालक अमरावती, राज्य संपर्क अधिकारी मुंबई, सहाय्यक शिक्षण उपसंचालक अमरावती, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रकाश मुकुंद ,सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक जगन मुंडे बुलढाणा, विभागीय समन्वयक विशाल जाधव अमरावती, जिल्हा समन्वयक प्रा. नीलकंठ राठोड बुलढाणा, पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी वामनराव फंड संस्थेचे अध्यक्ष यु.बी. धुंदाळे यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांच्या सदिच्छा भेटी होणार आहेत.

ह्या शिबिरामध्ये रोज सकाळी ८ ते १२ वाजे पर्यंत पाणी आडवा पाणी जिरवा, संपूर्ण स्वच्छता अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन ,आरोग्य, कृषी, बालविवाह प्रतिबंध ,व्यसनमुक्ती ,स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन इत्यादी विषयावर बौद्धिक मार्गदर्शन आणि श्रमदान होणार आहे. ह्या श्रमसंस्कार शिबिराचे नियोजन ना.मुकुल वासनिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विनोद ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी प्रा. मंगेश धांडे, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी जयश्री भिवटे, गट प्रमुख गायत्री रावणचौरे, गटप्रमुख मंगेश भालेराव हे करणार आहेत.



# रस्त्याची दुरवस्था

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** इंदापूर ते बोडखा या रस्त्याची दुरवस्था झाली असून खडी उखडलेले ठिकठिकाणी खड्डे त्यामुळे प्रवासी व वहानधारकांना मोठा त्रास सहन करावे लागत आहे वरिष्ठांनी याकडे लक्ष घालून रखडलेले इंदापूर ते बोडखा रस्ता तातडीने मजबुतीकरण डांबरीकरण करण्यात यावे असी मागणी नागरिकांतून होत आहे. गत तीनचार वर्षांपासून इंदापूर ते बोडखा या रस्त्याचे डांबरीकरण मजबुतीकरण काम रखडून आहे. पावसाळ्यात या रस्त्यावर ये जा करताना प्रवासी नागरिक व वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागला तर बातम्यांच्या माध्यमातून सतत रस्ता कामाची मागणी केल्यावरुन विभागाने पावसाळ्यात खडी मुरुम टाकून तातडीने तात्पुरता रस्ता केला होता परंतु आता पाऊस उघडल्यानंतर या रस्त्यालगत ठिकठिकाणी खड्डे व खडी उघडल्याने व वर येवून पसरल्याने ये जा करतांना प्रवासी वाहनधारकांना मोठा सहन करावे लागत आहे.सावंगी ते इंदापूर पर्यंत रस्ता चकचकीत चोपडा असुण परंतु तीनचार किलोमीटर अंतरापर्यंत रस्ता अतिशय नादुरुस्त खडी उखडलेली खड्डे त्यामुळे प्रवासी वाहनधारकांचे हाल सुरु आहे.

# स्व. विनायकराव शेळके पाटील स्मृती चषकाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** स्व.विनायकराव शेळके पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने स्व.विनायकराव शेळके पाटील स्मृतीचषक २०२३ चे आयोजन लोणंद ता.खंडाळा येथे करण्यात आले आहे. मंगळवार दि. २६/१२/२०२३ ते शुक्रवार दि. २९/१२/२०२३ पर्यंत भव्य फुलपिच टेनिस बॉल स्पर्धा क्रिकेटचे भव्य सामने घेण्यात आलेले आहे.अशी माहिती आयोजक माजी नगरसेवक हणमंत शेळके पाटील यांनी दिली.या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकाचे रु. ५५.५५५/- व ट्रॉफी चे बक्षीस एस. आर.धायगुडे (निवृत्त उप कार्यकारी अभियंता जि.प.सातारा),जे. बी.धायगुडे (निवृत्त शाखा अभियंता जि.प.सातारा), पै.नवनाथ गोवेकर (हॉटेल सुरभी),कुंभार परिवारकडून कै.विठ्ठल मारुती कुंभार यांच्या स्मरणार्थ,प्रदिप नामदेव क्षीरसागर यांचेकडून कै. नामदेव पांडुरंग क्षीरसागर (गुरुजी) यांच्या स्मरणार्थ द्वितीय क्रमांकाचे रु. ४४,४४४/- व ट्रॉफी चे बक्षीस विनोद दशरथ क्षीरसागर (मा. सभापती पं.स. खंडाळा),भरत शंकरराव शेळके पाटील (बांधकाम सभापती नं.प. लोणंद),डॉ.अमर शिंदे (अंकुर क्लिनिक, लोणंद),रोहन विलास धायगुडे पाटील (युवा नेते, लोणंद) तसेच तृतीय क्रमांकाचे रु. २२.२२२/- व ट्रॉफीचे बक्षीस सुजित अर्जुनराव शेळके पाटील (मा.सरपंच, निंबोडी) यांनी दिलेली आहेत.चांदीचे नाणे व ट्रॉफी सर्व मॅचेस,मॅन ऑफ द मॅच दत्तात्रय कोकरे सराफ,लोणंद,सायकल (स्पोर्टस्) मॅन ऑफ द सिरीज अनिशा सायकल मार्ट, लोणंद, रु.३,०००/- व ट्रॉफी सर्वोत्कृष्ट फलंदाज महादेव सुरेश शिंदे,लोणंद,रु.३,०००/- व ट्रॉफी सर्वोत्कृष्ट गोलंदाज अविनाश लोखंडे (श्री दत्त कन्स्ट्रक्शन,लोणंद),रु.५०१/-सर्व मॅचेस, सलग तीन षटकार श्रीधर भैय्या सोनवलकर (युवा नेते, पिंपरे),सेमी फायनल संघांना टी-शर्ट प्रोप्रा. विक्रांत प्रविणकुमार शहा (फ्रेंडस् फॅशनिस्टा,लोणंद) जेन्टस् रेडिमेड कपडचांचे भव्य दालन आदी विविध स्वरूपाची वैयक्तिक बक्षिसे देण्यात येणार आहेत. गाववाईज हाफ (१६ संघ) (एक आयकॉन खेळाडू) ता.२६ व २७ डिसेंबर २०२३,तालुकावाईज हाफ (८ संघ) ता.२८ डिसेंबर २०२३,सेमी फायनल व फायनल मॅच ता.२९ डिसेंबर २०२३ रोजी हे सामने संपन्न होणार आहेत.प्रवेश फी ५ हजार रुपये असणार आहे.विशेष सहकार्य रविंद्र रमेश क्षीरसागर (उपनगराध्यक्ष, लोणंद), संदिप दिलीप कर्णवर (पाडेगांव), बापुराव पोपट घुमाळ (बाळुपाटलाचीवाडी),मंडप सहकार्य विनायक ज्वेलर्स (प्रोप्रा. राजेंद्र शेळके पाटील व मंगेश क्षीरसागर), सचिन विनायक धायगुडे (बोरी),मैदान तयार करणे सौजन्य काशिनाथ (आप्पा) धायगुडे पाटील (अंदोरी), सोपान शेळके पाटील (सरपंच निंबोडी),दिलीप शेळके पाटील (बिल्डर, लोणंद), पाणी सौजन्य जनार्दन क्षीरसागर (सामाजिक कार्यकर्ते, लोणंद),स्टंप सौजन्य :सागर राऊत (मंगलमुर्ती स्पर्धा परीक्षा अॅकॅडमी,लोणंद) आदींकडून सहकार्य लाभलेले आहे.लाईव्ह प्रक्षेपण सौजन्य नवनाथ उर्फ किरण सुरेश शेळके पाटील (युवा नेते, लोणंद),निलेश कुंडलिक मलगुंडे (मलगुंडे फर्निचर मॉल) गोटेमाळ-लोणंद यांनी दिलेले आहे. गाववाईज व तालुकावाईज संघाना आधारकार्ड बंधनकारक राहील.सामने वन हाफ पध्दतीने खेळविले जातील. प्रथम नोंद करणाऱ्या २४ संघांना फक्त प्रवेश दिला जाईल.५०% प्रवेश फी जमा केल्याशिवाय संघ नोंदविला जाणार नाही.




सामने ६ षटकांचे खेळविले जातील, सामना सुरु होण्याअगोदर संघाने किमान १५ मिनिटे अगोदर उपस्थित रहावे. उशिर झाल्यास १० रनांची पॅनल्टी राहील,स्पर्धे दरम्यान काही अडथळे आल्यास त्यावेळी निर्णय घेण्याचे सर्वस्वी अधिकार कमिटीकडे राहतील असावं नियम व अटी असणार आहेत.गोटेमाळ मैदान, लोणंद-सातारा रोड, बोल्ट जीमच्या पाठीमागे, लोणंद, ता. खंडाळा जि.सातारा येथे ही स्पर्धा संपन्न होणार असून सहभागी होण्याचे आवाहन हणमंत विनायकराव शेळके पाटील व मित्र परिवार यांनी केलेले आहे.नांव नोंदणी संपर्क रामदास महानवर ( उपाध्यक्ष, माथाडी युनियन रायगड जिल्हा) प्रणव संकपाळ,अमर सोनवणे ,निवांत क्रिकेट क्लब यांच्या कडे करण्यात यावी.सेमी फायनल मधील सर्व संघास जेवणाची सोय केली आहे.यासाठी सौजन्य सागर बाबुराव शेळके-पाटील (नगरसेवक, न.पं. लोणंद) हॉटेल दुर्वांकुर (प्युअर व्हेज)लोणंद हे आहेत.

# जिल्हा परिषद पाणी पुरवठा कार्यालय रामभरोसे

## भोकर येथील प्रकार : जलजीवन मिशनची अर्धवट कामे

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील जिल्हा परिषद पाणीपुरवठा उपविभागीय कार्यालय रामभरोसे असून उपविभागीय अभियंता व शाखा अभियंता नेहमीच गैरहजर असल्याने ग्रामीण भागातील जनतेची कामे खोळंबली आहेत.तालुक्यात जलजीवन मशिनची कामे अर्धवट अवस्थेत पडून असल्याने ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. तालुक्यात सिंचन क्षेत्र कमी असल्याने उन्हाळ्यात तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागतो.यावर ऊपाय योजना म्हणून माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी नव्याने ग्रीड योजना सुरू केली आहे. सदरील कामास अद्याप गती मिळाली नाही.याच योजनेला जलजीवन मशिन अंतर्गत होत असलेल्या कामाचा आधार देण्याची व्यवस्था केली आहे.
तालुक्यात जलजीवन मिशनची कामे गावागावात अर्धवट स्थितीत खोदून ठेवल्याने नळाला पाणी येत नाही नळ योजनेचे कामे झाले नाही काही ठिकाणी झालेली कामे अंदाजपत्रकानुसार झाली नसून अर्धवट उरकण्यात आली अशी अनेक गावांची स्थिती झाली आहे. जिल्हा परिषद अंतर्गत पाणीपुरवठा उपविभागीय कार्यालय आहे मात्र येथील कार्यालयात अधिकारी नेहमीच गैरहजर असतात उपविभागीय अभियंत्याकडे तीन तालुक्याचा कारभार असल्याने भोकरला महिन्यातून एखाद्यावेळी येऊन जातात,शाखा अभियंता देखील एकच असल्याने ते नेहमीच दौऱ्यावर राहतात,कार्यालयात केवळ दोन कर्मचारी दिसतात त्यामुळे ग्रामीण भागातील



ग्रामपंचायतीची नळ योजना बाबतची कामे वेळेवर होत नाहीत.
तालुक्यातील ४८ गावांना जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजना राबविण्यात येणार आहे केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत गावामध्ये पाणीपुरवठा योजना राबवून त्या अंतर्गत "हर घर नलसे जल "अशी योजना असून दरडोई ५५ लिटर पाणी देण्याचे उद्दिष्ट आहे तालुक्यात जवळपास ७५ कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला असून कामाच्या मंजुरी सोबतच नांदेडहून कंत्राटदारांना जबाबदारी दिली आहे.सदर योजनेमध्ये गावात समिती स्थापन करून बँक खाते उघडून योजना सुरू करावयाची आहे मात्र तसे काही झालेले दिसत नाही.

# सक्षम बूथ रचनेसाठी सुपर वॉरियर्सनी पक्षीय निर्देशावर अंमल करावा : हंसराज अहीर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा क्षेत्रातील वरोरा विधानसभा क्षेत्र, वणी



विधानसभा क्षेत्र व आर्णी विधानसभा क्षेत्रातील सुपर वॉरियर्स, पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्त्यांशी संवाद साधून लोकसभा समन्वयक तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी बुथ रचना बळकट करीत सुपर वॉरियर्सने आपल्या नियंत्रण क्षेत्रातील प्रत्येकी तीन बुथवर 50 टक्क्याहून अधिक मतदान मिळेल याकरीता प्रभावीपणे कार्य करण्याची सुचना केली.
वरोरा येथे दि. 23 डिसे. 2023 रोजी पार पडलेल्या विधानसभानिहाय कोअर कमिटीच्या या बैठकीस वरोरा विधानसभा निवडणुक प्रमुख रमेश राजुरकर, डॉ. भगवान गायकवाड, अंकुश आगलावे, नरेंद्र जीवतोडे, करण देवतळे, रोशनीताई देवतळे, सुनिताताई काकडे यांचेसह प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. वणी व आर्णी विधानसभा क्षेत्राच्या कोअर कमिटी बैठकीस प्रमुख पदाधिकारी, सुपर वॉरियर्स उपस्थित होते. यावेळी उपस्थित पदाधिकारी, सुपर वॉरियर्स व बुथ प्रमुखांना मार्गदर्शन करतांना हंसराज अहीर यांनी महाविजय 2024 चे स्वप्न साकार करण्यास व मा. मोदीजींच्या नेतृत्वात देशाची आर्थिक महासत्तेच्या दिशेने वाटचाल होण्यासाठी सुपर वॉरियर्सनी आवश्यक ते निर्णय व विशेष लक्ष घालून बुथ रचनेचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्याची सुचना केली. सुपर वॉरियर्सने महाविजयाचा संकल्प घेत प्रत्येक मुद्दा, विषय समजुन घेवून त्याची तिन्ही बुथवर शत प्रतिशत अंमलबजावणी करण्याचे नियोजन करावे अशा सुचनाही अहीर यांनी वरील तिन्ही विधानसभा क्षेत्रातील कोअर कमिटी पदाधिकारी वॉरियर्स व उपस्थित कार्यकर्त्यांना केल्या.



# भोकरला नूतन शाळेच्या जागेवर अतिक्रमण

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी नांदेड रोडवर जिल्हा परिषदेची केंद्रीय नूतन शाळा असून सदर शाळेसमोर असलेल्या दुकानदारांनी शाळेच्या जागेत अतिक्रमण करून दुकाने वाढवित असल्याने भविष्यात जिल्हा परिषदेच्या शाळेची जागा हडप करण्याचा प्रयत्न केला जातो आहे.
#शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात जिल्हा परिषदेची केंद्रीय नूतन शाळा असून इथे पहिली ते सातवी पर्यंतचे विद्यार्थी शिकतात जवळपास ९०० विद्यार्थी शाळेमध्ये शिकत असून मागील काही वर्षापासून शाळेसमोर असलेल्या दुकानदारानी अतिक्रमण करून शाळेचा परिसर व्यापून टाकला आहे. शाळेसमोर घाण टाकल्याने मूलांचे आरोग्य धोक्यात

**शालेय समितीची तक्रार :** शालेय व्यवस्थापन समितीचा ठराव घेऊन आपण याबाबत वरिष्ठा कडे तक्रार करणार आहे . सर्वसामान्य गोरगरीब विद्यार्थी शाळेत असून त्या शाळेचा परिसर अतिक्रमणाच्या विळख्यात सापडल्याने येणाऱ्या काळात गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची मोठी गैरसोय होणार आहे .
**गजानन चोथे : शालेय शिक्षण समिती अध्यक्ष, भोकर**

आले आहे. शाळेसमोरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम काही दिवसापूर्वी सुरू करण्यात आली होती. तेथील वाद न्यायप्रविष्ट असल्याने अतिक्रमण तसेच राहिले. दुकानादारांनी दुकानाच्या मागील शाळेच्या जागेमध्ये हळूहळू अतिक्रमण सुरू केले आहे जेवढी पूर्वी जुनी दुकान होती त्यापेक्षा दुकाने वाढ होत आहेत. रविवारी ( ता.२४) काही दुकानदारानी आपले दुकाने मागे हटवून अतिक्रमण केले आहे.

# रब्बीतील गहू, हरभरा पिकांची थंडीमुळे वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी व सुलतानपूर मंडळा मधे सध्या थंडी पडत असल्याने रब्बी पिकांतील गहु हरभरा पिकांची वाढ होत असल्याचे चित्र आहे. येथे व परिसरात गत महिन्याभरा पासून ढगाळ वातावरण ओली धुई तथा अवकाळी मुसळधार पावसाचे विचित्र चक्र सुरू आहे.तर २५ नोव्हेंबर ते ३०नोव्हेंबर पर्यंत अवकाळी पावसाने लावून धरले होते.तर तद्नंतर ओली धुई व ढगाळ वातावरण बदलते हवामान बघता रब्बी पिकांतील गहु हरभरा पिकात वाढ होत नव्हती. तर अवकाळी पावसामुळे दुबारात गहु हरभरा ची पेरा करावा लागला.पण ना ना म्हणत हळुवारपणे गारठा व थंडीचे आगमान झाले असुण गहू हरभरा पिकांची वाढ होतांना दिसत आहे.व जबरदस्त पिकें बहरलेली दिसून येत आहे.



# वाघाचा मृत्यू; पाच दिवसांत तीन वाघ दगावले

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सावली वनपरिक्षेत्र अंतर्गत येत असलेल्या व्याहड खुर्द उपवन क्षेत्रातील कापसी बीट परिसरात आज सोमवार २५ डिसेंबर रोजी पहाटेच्या सुमारास गोसेखुर्द नहराच्या बाजूला शेतात वाघाचा मृतदेह सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे.सदर वाघाचा मृतदेह दिसल्याने ग्रामस्थांनी याची माहिती वनविभागाला दिली.त्यानंतर वनपाल कोडापे सह वनविभागाची चमू लगेच घटनास्थळी दाखल होऊन सदर वाघाचा मृत्यू कसा झाला या संदर्भातून पंचनामा सुरू आहे.
वाघाच्या शवविच्छेदनानंतरच वाघाचा मृत्यू कसा झाला आहे उघडकीस येणार असून या वाघाचा मृत्यूने या परिसरात खळबळ माजलेली आहे. दरम्यान २१ डिसेंबर रोजी ब्रम्हपुरी वन विभाग येथे, त्यानंतर २४ डिसेंबर रोजी शेतातील विहिरीत वाघाचा मृतदेह आढळला तर आता सावली येथे वाघ मृत मिळाला.

# राजू शेट्टी, आ. बच्चू कडू यांच्या उपस्थितीत लासलगावला जानेवारीत महाएल्गार

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** नवीन वर्षात स्वाभिमानीचे नेते राजू शेट्टी व प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांच्या प्रमुख उपस्थितीतकांदा उत्पादकांचा ३० एकरात राज्यव्यापी मेळावा लासलगाव येथे घेण्यात येणार असल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष निवृत्ती गारे यांनी दिली.

रविवार दि २४ डिसेंबर रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती, लासलगाव येथे केंद्र सरकारच्या कांदा निर्यात बंदी संदर्भात घेतलेल्या शेतकरी विरोधी धोरणाबाबत नाशिक जिल्हा कांदा उत्पादक शेतकरी, स्वाभिमानी शेतकरी संघटना व प्रहार जनशक्ती पक्ष यांची संयुक्त बैठक वकील उत्तम कदम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत कोसळणाऱ्या कांद्याच्या दराबाबत सविस्तर चर्चा झाली. केंद्र सरकारने दि.८ डिसेंबरला घेतलेल्या निर्यातबंदी निर्णयामुळे साडेतीन ते चार हजार रुपये क्विंटल प्रमाणे विकला जाणारा



कांदा भावात अचानक १५०० ते १६०० रुपयांची घसरण झाली, त्याचा मोठा फटका कांदा उत्पादक शेतकरी व निर्यातदांराना सहन करावा लागत आहे, केंद्राने जाहीर केलेल्या निर्यात धोरणाच्या निषेधार्थ स्वाभिमानी शेतकरी संघटना, प्रहार शेतकरी संघटना यांच्या मार्गदर्शनाखाली कांदा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी नवीन वर्षात कांदा उत्पादकांचा राज्यव्यापी संयुक्त एल्गार मेळावा घेण्यासाठी बैठक लासलगाव येथे आयोजित केली होती. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते मा.खा.राजू शेट्टी व प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते ना.मा. बच्चुभाऊ कडू यांच्या प्रमुख उपस्थितीत लासलगाव ता.निफाड येथे सुमारे ३० एकरात हा महामेळावा घेण्याचे ठरले आहे. याप्रसंगी दोन्ही शेतकरी संघटनेचे जिल्हा प्रतिनिधी उपस्थित होते. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष निवृत्ती गारे, प्रहार शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष जगन काकडे व स्वाभिमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष निवृत्ती गारे पाटील यांनी बैठक आयोजित केली होती. या बैठकीत स्वाभिमानी पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजू शिरसाठ, राज्य समन्वयक कुबेर जाधव, युवा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तुषार शिरसाठ, जयेश जगताप, गोरख संत, केदारनाथ नवले, संजय जाधव यांनी आपली कांदा प्रश्नावर भूमिका मांडली. याप्रसंगी निफाड तालुका अध्यक्ष गजानन घोटेकर, देवळा तालुका स्वाभिमानी शेतकरी संघटनेने तालुका अध्यक्ष कैलास कोकरे, नवनियुक्त संपर्क प्रमुख मच्छिंद्र जाधव, रवींद्र तळेकर, गणेश चांदुरे, श्रावण नवले, दिगंबर धोंडे, दीपक शिंदे, सुदाम देशमुख, सोहेल शेख, सागर गवळी, दीपक घोटेकर सह अनेक पदाधिकारी व कांदा उत्पादक शेतकरी उपस्थित होते.



## छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील अतिक्रमणावर हातोडा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** राष्ट्रीय महामार्ग ३६१ असून जवळपास या राष्ट्रीय महामार्गावरील रस्त्याचे काम संपुष्टात आले असून,लोहा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील अतिक्रमण होते,जवळपास ७० ते ८० दुकाने या अतिक्रमनात थाटली होती,आज लोहा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चिंचोलकर यांनी या अतिक्रमानवर हातोडा घातला.
जवळपास बऱ्याच वर्षांनी प्रशासनाचा प्रलंबित असलेला प्रश्न जिल्हाधिकारी अभिजित राऊत आणि जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली लोहा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांनी अतिक्रमण हटवण्याची धडक मोहीम आज दि.२३ रोजी हातात घेऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील अतिक्रमानवर हातोडा घातला जवळजवळ दोन ते तीन तास अतिक्रमणची मोहीम राबविण्यात आली. यामध्ये अतिक्रमनवाल्यांची दाणादाण उडवली, अतिक्रमन वाल्यांची कसल्याही प्रकारची गय केली जाणार नाही, असे यावेळी चिंचोळकर स्वतः थांबून ही सर्व कार्यवाही केली. या मोहिमेमुळे शहरातील सर्वच स्तरातून पोलीस निरीक्षक चिंचोळकर याचं कौतुक होत आहे.

## एन.सी.सी.च्या तीन कॅडेटना यंदाच्या 'मेजर हेमंत मांजरेकर ट्रॉफी' व रोख बक्षिसे प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** अखिला भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषद महाराष्ट्र आणि गोवाच्या वतीने एस.पी. महाविद्यालयातील एन.सी.सी. विभागाच्या तीन कॅडेट्सला ह्या वर्षीचा"मेजर मांजरेकर फिरता चषक" व रोख बक्षिसे प्रदान करण्यात आली. या समारंभामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून १९७१ च्या युद्धात सहभागी झालेले एयर मार्शल भूषण गोखले आणि नौदल निवृत्त अधिकारी विनायक अभ्यंकर होते.कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रमुख पाहुण्यांनी भारत मातेचे पूजन केले. मेजर हेमंत मांजरेकर ह्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात करून आदरांजली वाहण्यात आली. नंतर अखिल भारतीय पूर्व सेवा सैनिक परिषद यांच्यातर्फे व्यासपीठावरील प्रमुख पाहुण्यांचा स्वागत व सत्कार करण्यात आला.एअर मार्शल प्रदीप बापट ( निवृत्त ) ह्यांचे अध्यक्षीय समारोपाचे भाषण झाले.कार्यक्रमास एअर मार्शल भूषण गोखले आणि निवृत्त नौदल अधिकारी विनायक अभ्यंकर हे प्रमुख पाहुणे होते. ह्यांनी त्यांच्या १९७१ च्या युद्धाच्या आठवणी सांगितल्या.एस. पी. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुनील गायकवाड़ ह्यांनी छात्र सैनिकांना मार्गदर्शन केले.
कार्यक्रमाचे आयोजन एन. सी. सी. ऑफिसर लेफ्टनंट गोविंद धुळगंडे, लेफ्टनंट दीपाली बुटाला,लेफ्टनंट बाळासाहेब भौराले,ह्यांनी एअर व्हॉईस मार्शल नितीन वैद्य (निवृत्त) ह्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. मेजर हेमंत मांजरेकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ पहिले सर्वोत्कृष्ट एन.सी.सी. कॅडेट चे पारितोषिक व फिरता चषक व रोख रक्कम रुपये २ हजार,कॅडेट ज्युनिअर अंडर ऑफिसर तेज दीक्षित ह्यास,त्याच प्रमाणे द्वितीय स्थान पी.ओ. ओंकार मुळे ह्यास फिरता चषक व रोख रक्कम रुपये दीड हजार आणि तृतीय स्थान ज्युनिअर अंडर ऑफिसर रितेश राठोड ह्यास फिरता चषक व रोख रक्कम रुपये दीड हजार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. कॅडेट श्रिया जगताप हिने सूत्र संचलन केले.तर आभार कॅडेट अदिती जोशी हिने मानले.





## प्रा. खेडेकर यांच्या वाढदिवसानिमित्त ब्लँकेट वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** प्रा.नरेन्द्रभाऊ खेडेकर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी म्हणून ब्लँकेटचे वाटप शिवसेना उबाठा चे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बशिरे (बच्छिरे) यांनी केले.
शहरातील भीम नगर परिसरात गरजवंत महिला भगिनींना सामाजिक बांधिलकी म्हणून प्रा.नरेंद्र खेडेकर शिवसेना उबाठा बुलढाणा जिल्हा संपर्कप्रमुख यांच्या वाढदिवसाच्या पूर्व संध्येला शिवसेना जिल्हा संघटक डॉ. गोपाल बशिरे (बच्छिरे) यांच्या वतीने लोकरीच्या ब्लॅकेट चे वाटप करण्यात आले. सध्या स्थितीत कडाक्याची थंडी पडत आहे व अशा वेळेस लोकरीचे ब्लॅकेट मिळाल्याबद्दल गरजू महिला भगिनींनी श्री नरुभाऊ खेडेकर याच्यावर आशीर्वादाचा वर्षाव केला. याप्रसंगी तालुकाप्रमुख एड दीपक मापारी, शहर प्रमुख गजानन जाधव सर, युवा शहर प्रमुख श्रीकांत मादनकर, सहसंघटक सुभाष पुरी, सुदान अंभोरे सर, तानाजी अंभोरे, किरण कमडे, अनिल पसरटे, अजय बछिरे, सुनील पसरटे यांच्या सह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

## गणू महाराज यांना भारतीय कौशल्य पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बागरेचा**

**नेर :** तालुक्यातील म्हसदी येथील गणू महाराज यांना दिल्ली येथे बी.के.ए.स्पेस युथ असोशियनतर्फे गणू महाराज यांना भारतीय कौशल २०२३ चा पुरस्कार गणू महाराज याना प्रदान करण्यात आला आहे.तसेच महाराज आपली समाजसेवा ही उल्लेखनीय आहे आपल्या कडे मदत मागणारा व्यक्ती कोण आहे? याचा कधीही आपण विचार केला नाही.आपण फक्त त्या व्यक्तीला आपली गरज आहे म्हणून मदत केली.
गणू महाराज हे स्वतःचे वैयक्तिक किवा व्यक्तिगत स्वार्थ पाहिला नाही. तसेच गणू महाराज हे त्यांच्या कार्यात नेहमीच अग्रेसर असतात महाराजांनी कोरोना काळात देखील मोठ्या प्रमाणात मदत केलेली आहे व गोरगरिबांना नेहमी अन्नदान करीत असतात म्हणून त्यांचे कामाची दखल घेत त्यांना भारतीय कौशल्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. परमेश्वराने मला समाजसेवा करण्यासाठी पाठविले आहे.समाजसेवा हिच ईश्वर सेवा हे मानून आजपर्यंत फक्त आपण समाज सेवाच केली. समाजातील कोणताही बुद्धीवादी व्यक्ती आपल्या कार्याचे देखील कौतुक करत असतात.तसेच गणू महाराज यांच्या समाजसेवा बद्दल लिहिण्यासाठी भरपूर आहे त्यासाठी शब्द ही कमीच पडतात. तसेच म्हसदी गावाचे भूषण आदरणीय दीपक रत्नाकर दीक्षित (गणू महाराज) यांना भरतीय कौशल्य आवर्ड भेटल्या बद्दल त्यांचे म्हसदी गावासह परिसरातील मोठे कौतुक व अभिनंदन होत आहे.
तसेच गणू महाराज हे म्हसदी गावाचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात पुरस्कार प्राप्त करून प्रसिद्ध करत आहेत.
आई भवानीच्या कृपेने आपल्या हातातून यापुढेही समाजसेवा घडत राहो असेही सांगण्यात आले.तसेच पुरस्कार स्वीकारताना यावेळी राष्ट्रीय लोक जनशक्ती चे खासदार श्री संदेश यादव,आम आदमी पार्टीचे आमदार दयानंद चंडिला,धनवंती चंडिला आमदार,तसेच दिल्ली मधील बिजनेस महिला सरिता चव्हाण,तसेच हरियाणा राज्याची फिल्म अभिनेत्री व उद्योजक प्रवीण शर्मा डायरेक्टर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण हे मोठ्या उत्साहात पार पडले.




## भरधाव टिप्परने तरुणास चिरडले

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** तालुक्यात दिवसागणिक अपघाताचे प्रमाण वाढत



आहे. नियमबाह्य भरधाव वेगात चालणाऱ्या वाहनांमुळे सर्वसामान्यांचे जीवन धोक्यात आले आहे. याकडे वाहतूक पोलिसांनी विशेष लक्ष द्यावे अशी मागणी जोर धरत आहे. तालुक्यातील केनवड येथील ३४ वर्षीय तरुण शेख राजीक शेख मोहम्मद हे रिसोड वरून आपल्या गावी जात असताना सरपखेड गावाजवळ समोरून येणाऱ्या एका भरधाव टिप्परणे धडकले तर मागून येणाऱ्या दुसऱ्या भरधाव टिप्परणे सदर इसमास चिरडले. परिणामी अपघातग्रस्त राजीक या तरुणाचा जागीच चुराडा झाला आहे.

प्राप्त माहितीनुसार, रिसोड वरून केनवडला आपल्या दुचाकीने जात असलेल्या शेख राजीक शेख मोहम्मद या इसमास सरपखेड जवळ समोरून येणाऱ्या टिप्पर क्रमांक एम. एच. ३७ टी.२२७७ या वाहनाने जबर धडक दिली.तर त्याच्या मागून येणाऱ्या टिप्पर क्रमांक एम. एच. ३७ टी २२७५ हे वाहन सदर इसमाच्या अंगावरुन गेले.या भीषण अपघातात शेख राजीक शेख मोहम्मद या तरुणाचा जागीच चुराडा झाला आहे. मृतकाचे रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले असून, मृतकाच्या भावाने रिसोड पोलीस स्टेशनल तक्रार दाखल केली आहे. त्याअनुषंगाने पोलिसांनी विविध कलमानुसार गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरु केला आहे. अपघाताच्या घटनेत वाढ होत असल्याने पोलिसांनी विशेष जनजागृती मोहीम हाती घ्यावी अशी मागणी होत आहे.

## पर्यटकांची गैरसोय होऊ नये म्हणून बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** क्रिसमस व सरत्या वर्षानिमित्त दर वर्षी मोठ्या संख्येने पर्यटक जागतिक पर्यटन क्षेत्र असलेले उरण तालुक्यातील घारापुरी बेटावर येत असतात.चारही बाजुना समुद्र व मधोमध सुंदर असे डोंगर असे निसर्गरम्य हे पर्यटन क्षेत्र असल्यामुळे पर्यटक येथे मोठया प्रमाणात येत असतात. त्यामुळे गर्दीचेवेळी पर्यटकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून मोरा सागरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घारापुरी बेटावर काम पहात असलेल्यां सर्व विभागाचे अधिकारी तसेच स्थानिक व्यवसायिक व ग्रामपंचायतीची कार्यकारिणी यांच्या समवेत दिनांक २३/१२/२०२३ रोजी एलिफंटा लेणी येथील भारतीय पुरातत्व विभागाचे हॉलमध्ये बैठक घेण्यात आली.यावेळी बेटावर येणाऱ्या पर्यटकांना उद्‌भवणा-या समस्येवर चर्चा करून त्यावर उपाय योजना करण्याचे सर्व विभाग सज्ज असल्याचे सांगण्यात आले. बैठकीचे सुरुवातीला नवनिर्वाचित नियुक्त झालेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांचे ग्रामपंचायतीचे वतीने स्वागत करण्यात आले. सदरचे बैठकीसाठी ग्रामपंचायतीच्या सरपंच मीना भोईर, उपसरपंच बळीराम ठाकुर, सदस्य सचिन लाड, सदस्या नीता ठाकुर,भारती पांचाळ, माजी उपसरपंच सचिन म्हात्रे, व्यवसायिक तथा जेष्ठ नागरिक यशवंत म्हात्रे, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या एलिफंटा विभागाचे उप बंदर निरिक्षक विनायक करंजे, एलिफंटा सिक्युरिटी गार्डचे प्रमुख अजय झा व त्यांचे सहकारी गेट वे जलवाहतूक संस्थेचे प्रतिनिधी ग्रामपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते.


हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# अवैध मुरुम उत्खनन; जेसीबीसह तीन वाहने जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**दशरथ आंबेकर**

**किनवट :** ईस्लापुर जवळील मौजे पांगरी शिवारामध्ये जेसीबीच्या साह्याने गौण खनिजाचे उत्खनन अवैधरीत्या करत असताना दि.२१ डिसेंबर रोजी किनवट गौण खनिज प्रशासनानेअवैधरित्या मुरुमाचे उत्खनन करणाऱ्या एक हायवा एक टिप्पर व जेसीबी, मे.युएनडी इंन्फ्रा प्रा.ली.कंपनी लातुरच्या वाहनावर सदरील गौण खनिज प्रशासनाने धडाकेबाज कारवाई करुन जप्त वाहणे स्थानिक पोलिसांच्या ताब्यात दिल्याने यामुळे गुत्तेदारी क्षेत्रातील व अवैधरित्या रॉयल्टी नकाढता उत्खनन करणाऱ्या अनेक तस्करांचे धाबे दणाणलेआहेत. मौजे पांगरी शिवारातील राज्य रस्त्यावरील काम गेल्या वर्षभरापासून चालुआहे. या कामावर अवैधरीत्या गौण खनिज म्हणुन लाखो ब्रास मुरुम नेत असताना,हायवा टिप्पर क्रमांक एमएच- २४ऐव्ही ६७७६ व टिप्पर क्रमांक एमएच- २७ ईएक्स ०१५३ व जेसीबीच्या साह्याने गौण खनिजाचे उत्खनन अवैधरीत्या करत असल्याची माहिती महसूल प्रशासनाला प्राप्त झाल्याने.या प्रकरणी कुठल्याही संदर्भात कुणालाही माहिती न मिळू देता किनवटचे सहाय्यक जिल्हाधिकारी एस. कार्तिकीयन व किनवटच्या तहसीलदार डॉ. मृणाली जाधव यांनी माहिती गुप्त ठेवून गौण खनिज जप्त पथकास सदरील घटनास्थळाकडे तात्काळ पाठवुन कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या पथकातील प्रमुख नायब तहसीलदार विकास राठोड, मंडळाधिकारी प्रेमानंद लाठकर, तलाठी बालाजी वसमतकर,अंकुर सकवान, विश्वास फड, मंगेश बोधे, वाहन चालक गौस खान यांनी मोठ्या धाडसाने सदरील कारवाई यशस्वीरित्या पार पाडली आहे.तिन्ही वाहनावर कारवाई करुन घटनास्थळी पंचनामा करून ताब्यात घेतले आहे. गौण खनिज प्रशासनाच्या या कारवाईमुळे अनेक गुत्तेदार क्षेत्रातील मंडळीचे वअनाधिकृतरित्या तसेच



रॉयल्टी नकाढता उत्खनन करणाऱ्या तस्करांचे धाबे दणाणले असल्याचे चित्र इस्लापूर परिसरात पहावयास मिळत आहे. महसूल प्रशासनाच्या या कारवाईमुळे अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्या तस्करांत भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. अश्या कारवाया निरंतर चालणे गरजेचे असुन, एखादी कार्यवाही करुन नामानिराळे होता कामा नये, अशी मागणी पर्यावरण प्रेमी व सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडून नेहमी होत असते.

# केंद्र, राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणाविरोधात जिल्हा कचेरी समोर लोकस्वराज्य संघटनेकडून लक्षवेधी मुंडन आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** लोकस्वराज्य आंदोलन नांदेड उत्तर व दक्षिण जिल्हा कमिटी आयोजित लक्षवेधी मुंडण आंदोलन करण्यात आले आहे. केंद्र व राज्य सरकारने घेतलेल्या चुकीच्या निर्णया विरोधात आणि विविध प्रकारच्या मागण्या संदर्भात दिनांक २२डिसेंबर २०२३ रोजी शुक्रवारी दुपारी ठिक अडीच वाजता जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड समोर संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक रामचंद्रजी भरांडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली तथा नेतृत्वाखाली एक अनोखे आंदोलन तथा लक्षवेधी आंदोलन केले आहे. यामध्ये अनेक पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून आपल्या डोक्याचे केस कापुन राज्य सरकार व केंद्र सरकारने सर्वसामान्य जनता,अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,ओबीसी, अल्पसंख्यांक भटक्या विमुक्त जनजाती संदर्भात मागील काळात घेतलेल्या जनविरोधी निर्णयाविरोधात केलेले कायदे व घेतलेले निर्णय रद्द करण्यात यावे.तसेच या राज्य शासन व केंद्र शासनाचा जाहीर निषेध करण्यासाठी कार्यकर्त्यांकडून मुंडण आंदोलन करण्यात येत असल्याचे, आपल्या निवेदनामध्ये सांगितले आहे. या मुंडण आंदोलनामध्ये विविध मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये जिल्हा परिषद शाळा व मनपा शाळा खाजगी कंपनीला चालवण्याचा निर्णय तात्काळ मागे घेण्यात यावा. ईव्हीएम मशीन



ऐवजी बॉयलेट पेपरवर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेण्यात याव्या.नांदेड जिल्ह्यात व शहरात मोठ्या प्रमाणात सुरु असलेले खाजगी शिकवणी वर्ग त्वरित बंद करण्यात यावे.देशातील मंदिराकडे असलेले विविध स्थावर-जंगम मालमत्तेचे राष्ट्रीयकरण करण्यात यावे. राज्यातील सरकारी नोकरीचे खाजगीकरण रद्द करावे.देशातील बँकाचे राष्ट्रीयकरण करावे.एससी, एसटी,ओबीसी,अल्पसंख्यांक प्रवर्गातील सुशिक्षित बेरोजगारांना विना तारण,बिनाव्याजी २५ लाख रुपयापर्यंत त्वरित कर्ज देण्यात यावे.अनुसूचित जाती प्रवर्गाचे अबकड आरक्षण वर्गीकरण त्वरित करण्यात यावे.तसेच बार्टीच्या धर्तीवर आर्टीची स्थापना करण्यात यावी.तर डॉ.साठे आर्थिक विकास महामंडळाना लोकसंख्येच्या प्रमाणात एक हजार कोटी रुपयांचे खेळते भांडवल त्वरित निधी मंजुर करण्यात यावा. मुंबई विद्यापीठास डॉ.अण्णाभाऊ साठे यांचे नाव त्वरित देण्यात यावे.जिल्ह्यात व खेडेगावात मागासवर्गीय वस्तीमध्ये अवैध देशी दारु व विदेशी दारु विक्री करणाऱ्या लोकांना,अभय देणाऱ्या संबंधित पोलीस स्टेशनच्या बीट जमादार व सहाय्यक दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकारी- कर्मचाऱ्यांचीअवैध दारु विक्रीवर कारवाई नकरणाऱ्या संबंधितांची खातेनिहाय चौकशी करून तात्काळ अवैध दारु व अवैध वाहतुकीवर बंदी करण्यात यावी.असे निवेदन निवासी जिल्हाधिकारी नांदेड यांना देण्यात आले आहे.या निवेदनावर संघटना प्रमुख प्राध्यापक रामचंद्रजी भरांडे सर, कामगार आघाडीचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेबदादा पवार नायगाव बा., संजय खानजोडे हदगाव,शेषेराव रोडे सर चिफ कंमाडर एलएसए संरक्षण युनिट महाराष्ट्र, दक्षिण जिल्हाध्यक्ष कैलास सूर्यवंशी, जिल्हाध्यक्ष नांदेड उत्तरचे माणिक कांबळे बारडकर,धोंडोपंत बनसोडे, गंगाधर गायकवाड निमटेककर,पीजी केदारे, साहेबराव गव्हारकर, राजु झुंजारे जामगावकर, राजु गायकवाड मंडाळेकर, सदानंद ऐरणकर तालुकाध्यक्ष,दयानंद गायकवाड कोळीकर,श्रीकांत वाघमारे कोहळीकर, रामदास जळपते पोटेकर तालुका सचिव, माधव जळपते, बबन जळपते, मंगेश राऊत, साईनाथ जळपते आदी जणांच्या शेकडो स्वाक्षऱ्या आहेत. मुंडण आंदोलन यावेळी लक्षवेधी ठरले आहे.



# ज्वारी हुरड्यात

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बोडखा लोणी धामणगाव गंधेश्वर रेल इंदापूर झरी शिवार क्षेत्रात रब्बी पिक हंगामातील ज्वारी हुरड्यात आली आहे. मराठवाड्यात बोडखा लोणी धामणी गंधेश्वर रेल इंदापूर झरी येथील रब्बी पिक हंगामातील शालु ज्वारी मराठवाडाभर प्रसिद्ध असुण नामांकित आहे.या शिवार क्षेत्रात विशेष म्हणून रब्बी पिक हंगामातील शालु ज्वारी साठी शेती राखुन ठेवून शालु ज्वारी पिक घेण्यात येते व ती खाण्यास अतिशय उत्कृष्ट गोड पोषक शक्तीवर्धक असल्याने मराठवाड्यातून येथील शालु गावरान ज्वारीची मागणी असते यंदा पावसाळ्यात पावसाचा जेमतेमपणा व आता अवकाळी मुसळधार पावसामुळे व थंडी अभावी म्हणावे तसे ज्वारी पिक आले नाही परंतु शालु ज्वारी हुरड्यात आली असल्याचे चित्र आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर घर संसार
किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर